विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००६ |
| वर्ष | : | सातवे |
| अंक | : | ११ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ११०**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.
# दिशा

वर्ष सातवे / अंक ११ / ऑक्टोबर २००६

## संपादकीय

### ज्ञानाधिष्ठित समाजाकडे जाताना

विद्या प्रसारक मंडळाच्या शिक्षकदिनी होणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण अशा पदवी व पदविका प्रदान सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून भारताच्या अणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष पद्मभूषण डॉ. अनिल काकोडकर उपस्थित होते. येत्या काही वर्षांत दर्जात्मक शिक्षण दिले गेले तरच उद्याचे तरुण ज्ञानाधिष्ठित समाजाच्या दृष्टीने सक्षम होतील हा महत्त्वाचा विचार त्यांनी आपल्या भाषणात मांडला. श्रमाधिष्ठित समाजाकडून ज्ञानाधिष्ठित समाजाकडे जगाची वाटचाल चालू आहे, कौशल्यांऐवजी ज्ञानाचे महत्त्व दिवसेन दिवस वाढत आहे या पार्श्वभूमीवर त्यांच्या विचाराला फार महत्त्व आहे.

डॉ. अनिल काकोडकरांच्या या भाषणात त्यांनी स्वायत्त अभ्यासक्रम राबवीत असल्याबद्दल विद्या प्रसारक मंडळाचे विशेषत्वाने अभिनंदन केले. भविष्य काळात पारंपरिक शासकीय नोकऱ्या कमी होत जाऊन शासनमान्यतेपेक्षा दर्जाला महत्त्व येईल हे त्यांचे भाकीत महत्त्वाचे आहे. आज आपल्या देशातही हा विचार मूळ धरताना दिसत आहे. जागतिकीकरणामुळे स्पर्धात्मक वातावरण वाढले आहे. या वाढत्या स्पर्धात्मक वातावरणात उपयुक्तता असणारे असे पाठ्यक्रमच तग धरून राहतील. आपल्याकडील अभ्यासक्रमांमध्ये एका विशिष्ट गतीने का होईना, उपयुक्तता आणण्याचा प्रयत्न् चालू झाला आहे.

डॉ. काकोडकर यांच्या विचारांचा एक अर्थ असाही आहे ही उपयोजित संशोधनाला महत्त्व प्राप्त होणार आहे. केवळ पदवीसाठी केले जाणारे निरुपयोगी संशोधन, त्यावर होणारा खर्च व त्याची फलनिष्पत्ती यांचा आपण विचार करावयास हवा. येत्या काही दशकात मोठ्या आर्थिक उलाढाली असणाऱ्या देशांची लोकसंख्या स्थिर होण्याच्या वाटेवर असल्याने इतर देशांतील, ज्यात भारताचाही समावेश आहे, तरुणांना अनेक संधी उपलब्ध होणार आहेत. असे मनुष्यबळ ज्ञानाधिष्ठित समाजातच निर्माण होणे शक्य आहे; अर्थातच त्यासाठी शिक्षणाचा दर्जा, पाठ्यक्रमाचा चांगला असावयास हवा.

त्यांच्या या विचारांच्या पार्श्वभूमीवर मूल्यांचा जो विचार त्यांनी! व्यक्त केला तो देखील महत्त्वाचाच आंहे. मूल्य शिक्षणासाठी माणसामाणसांतील विश्वासाचे नाते दृढ होणे गरजचे आहे. कारण जगाची वाटचाल जसजशी ज्ञानाच्या अधिष्ठाकडे होईल तस तसे चांगले अभ्यासक्रम महत्त्वाचे ठरत जातील. विद्याप्रसारक मंडळाची वाटचाल अशा ज्ञानाधिष्ठित समाजाकडे नेणाऱ्या अभ्यासक्रमांची अंमल बजावणी करण्याकडे चालू आहे. परंपरा व भविष्य यांचा सांधा जोडणारा विद्याप्रसारक मंडळाचा प्रयत्न त्यांना अभिनंदनीय वाटला, हे म्हणूनच महत्त्वाचे आहे!




वर्ष सातवे / अंक ११ / ऑक्टोबर २००६

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ११ वे / अंक ४ था)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@vsnl.net

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | विद्या प्रसारक मंडळ दीक्षांत समारंभ | डॉ. विजय बेडेकर | ३ |
| २) | डॉ. अनिल काकोडकर यांचे भाषण | डॉ. अनिल काकोडकर | ६ |
| ३) | एका उज्ज्वल शैक्षणिक युगाची इतिश्री | डॉ. मो. दि. पराडकर | १० |
| ४) | श्री मध्वाचार्य आणि द्वैत संप्रदाय | शं.बा.मठ | १३ |
| ५) | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | यशवंत साने | १९ |
| ६) | कथा विकास व १९४० पर्यंतची मराठी कथा धावता दृष्टिक्षेप (लेखांक २) | मोहन पाठक | २६ |
| ७) | इथे ओशाळला विधाता | मोहन पाठक | ३३ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३५ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# विद्या प्रसारक मंडळ दीक्षांत समारंभ

*विद्या प्रसारक मंडळाच्या ५ सप्टेंबर २००६ रोजी झालेल्या तिसऱ्या दीक्षांत समारंभात मंडळाचे विश्वस्त व कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी केलेले प्रास्ताविक भाषण - संपादक*

आजच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. अनिल काकोडकर, आमच्या संस्थेचे ज्येष्ठ सभासद श्रीयुत कांदीकर आणि उपस्थित बंधु-भगिनींनो,

दीक्षांत समारंभाचे हे आपले तिसरे वर्ष आहे. आपण जे स्वायत्त अभ्यासक्रम राबवतो त्या अभ्यासक्रमांर्गत जे विद्यार्थी यशस्वी झाले आहेत, त्या विद्यार्थ्यांकरिता हा समारंभ आज तिसऱ्या वर्षी यशस्विरीत्या पार पाडत आहोत.

आपल्याला ज्ञात आहेच, पण डॉ. काकोडकरांच्या माहितीकरिता म्हणून, विद्या प्रसारक मंडळ ठाण्यामध्ये गेली ७५ वर्षे शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहे. साधारणत: १९३२ साली या कार्याला सुरुवात झाली. आणि त्याची नोंदणी १९३५ साली झाली. सुमारे ७५ वर्षांच्या कालावधीत प्राथमिक शाळा, मराठी माध्यमाची शाळा, इंग्रजी माध्यमाची शाळा, त्यानंतर कला-वाणिज्य महाविद्यालय, विधी महाविद्यालय, तंत्रनिकेतन अशा अनेक माध्यमांतून ठाणे शहराच्या शैक्षणिक गरजा विद्या प्रसारक मंडळ भागवीत आहे.

आज सुमारे १६,००० विद्यार्थी या सर्व महाविद्यालयांतून व शाळांमधून शिक्षण घेत आहेत. आणि सुमारे ५०० पेक्षा जास्त शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी इथे आपली रोजी-रोटी मिळवीत आहेत.

विद्या प्रसारक मंडळ विद्यापीठाने घालून दिलेल्या कार्यक्रमांव्यतिरिक्तही व्यापक सामाजिक हिताच्या दृष्टीकोनातून विद्यार्थ्यांना स्वावलंबी करण्याकरता, त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास साधण्यासाठी गेली १०-१२ वर्षे अनेक स्वायत्त अभ्यासक्रम राबवीत आहे, आमचे जे प्रगत अध्ययन केंद्र आहे त्या केंद्रामार्फत हे अभ्यासक्रम चालू झाले. सुरुवातीला Analytical Chemistry हा विषय होता. त्यामध्ये काही इतर अभ्यासक्रमांची भर पडली. त्याच्यामध्ये विशेषत: Horticulture(उद्यान विद्या शाखा) चा विशेष उल्लेख करता येईल.

त्याचप्रमाणे आमची संस्था Institute of Management Studies, (जिचे नाव आता Dr. V. N. Bedekar Institute of Management studies आहे) गेली २५ वर्षे सुरुवातीला स्वायत्त कार्यक्रमच राबवीत आली आहे, आणि त्यांचा सुद्धा जो PGDBM आणि E-MBA हा जो कार्यक्रम आहे हा ही अजूनपर्यंत स्वायत्तच आहे.

या वर्षापासून त्याला महाराष्ट्र सरकारची मान्यता मिळाली असून त्या कार्यक्रमांचा समावेश आता महाराष्ट्र सरकारच्या मान्यताप्राप्त अभ्यासक्रमात झालेला आहे.

मित्रहो, शिक्षणाची महती किंवा शिक्षण महत्त्वाचं आहे हे सांगण्याची वेळ आता निघूनच गेलेली आहे. कारण भारताने या संदर्भात बरीच मोठी प्रगती केलेली आहे. अगदी आपल्या टीकाकारांनाही मान्य करावला लागतं की, भारताची साक्षरता ६५ ते ७०% च्या जवळपास आहे. शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये प्रगती जरी खूप करायची असली तरी सुद्धा भारताने गाठलेले टप्पे हे स्वावलंबनाच्या दृष्टीने नक्कीच अतिशय महत्त्वाचे आहेत.



डॉ. काकोडकरांचे स्वागत करताना डॉ. विजय बेडेकर

माहिती तंत्रज्ञान सारख्या क्षेत्रामध्ये भारताने दाखवलेली प्रगती, व्यवस्थापन क्षेत्रामध्ये आज जगातल्या अनेक मान्यवर संस्थांमधून भारतीय नागरिकांचं असलेलं उच्चपदस्थ स्थान आणि इतरही क्षेत्रांमध्ये आज भारतीय तरूण पिढी दाखवत असलेलं नैपुण्य नक्कीच आपल्या सर्वांना आनंददायी आहे आणि त्याबद्दल अभिमान वाटावा अशी ही गोष्ट आहे.

पण म्हणून या गोष्टी पुरेशा आहेत असं म्हटलं तरी ते योग्य होणार नाही. विशेषत: शिक्षणाच्या संदर्भामध्ये आत्ताच ११व्या आयोगाकरिता आपले पंतप्रधान मा. डॉ. मनमोहन सिंग यांनी सुमारे १० ते १२ दिवसांपूर्वी एक कार्यक्रम ११ व्या प्लॅनिंग कमिशनला दिलेला आहे, आणि तो अतिशय चांगला आहे. त्याच्यामध्ये त्यांनी जे काही मुद्दे मांडले आहेत त्यामध्ये प्राथमिक शिक्षणाबरोबरच Secondary आणि Tertiary शिक्षणावरही महत्वाचा भर त्यांनी दिलेला आहे.

सबंध भारतात महत्वाची विद्यापीठे स्थापन करणे, अनेक महाविद्यालयांना विशेष दर्जा प्राप्त करून देणे, वेगवेगळे अभ्यासक्रम चालू करणे याला महत्व दिलेले आहे. याबरोबरच त्यांनी जो एक महत्वाचा मुद्दा मांडलेला आहे तो माझ्या दृष्टीने, विशेषत: शिक्षणसंस्था या दृष्टीने, महत्त्वाचा आहे. या शिक्षण क्षेत्रात फक्त सरकारी माध्यमातून भारतासारख्या विशाल देशामध्ये संपूर्ण शिक्षणाचं स्वावलंबी होणं फार कठीण आहे. म्हणून अनेक उद्योगधंदे, उद्योगपती आणि समाजाने त्याच्यामध्ये हातभार लावणे आणि अशा स्वायत्त संस्था, जसं विद्या प्रसारक मंडळ आहे अशा स्वायत्त संस्थांनी त्यामध्ये हातभार लावून हे Secondary आणि Tertiary Education जे आहे ते देण्याकरिता पुढे यायला पाहिजे.

मला असं वाटते स्वातंत्र्याच्या आधीपासून शिक्षणाकरिता भारतामध्ये सर्वात जास्त प्रयत्न झाले, ते स्वायत्त संस्थांनीच केलेले आहेत. आपल्याला माहीत आहे की, महाराष्ट्रात तर लोकमान्य टिळक आणि आगरकर यांनी ज्या शाळा व महाविद्यालये चालू केली त्यातून आज शाळा आणि महाविद्यालयांच्या बाबतीत नक्कीच महाराष्ट्र प्रगती पथावर आहे.

मित्रहो, मी म्हटलं तरी सुद्धा जोपर्यंत शिक्षणावरचे अंकुश आणि शिक्षणावरचे निर्बंध हे सरकारच्या हातात आहेत, ते दूर होत नाहीत तोपर्यंत त्या प्रगतीमध्ये एक प्रकारची गती येणार नाही.

सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाने या संस्थांना बरीच स्वायत्तता दिलेली आहे. त्यांची फी ठरविण्याचं, त्यांच्या दैनंदिन कार्यक्रमात, प्रवेशामध्ये ही स्वायत्तता दिलेली आहे. पण तरीसुद्धा ही स्वायत्तता अजूनही या शिक्षण संस्थांना त्या-त्या विद्यापीठाने देऊ केलेली नाही. ही गोष्ट तेवढी चांगली आहे, असं मला स्वत:ला वाटत नाही.

विद्या प्रसारक मंडळ हे आता तरी ठाण्यापुरतं मर्यादित आहे आणि आपल्या मर्यादित कार्यक्षेत्रामध्ये याचा प्रयत्न आहे की, इथून नुसते पदवी घेतलेले प्रशिक्षित विद्यार्थी बाहेर पडतील असं नाही तर एका वेगळ्या दृष्टीकोनातून, वेगळ्या सामंजस्यातून, आपल्या स्वत:च्या समाजाकरिता असलेल्या दायित्वातून, वेगळ्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून हे विद्यार्थी बाहेर पडतील.

हा आमचा नेहमीचाच प्रयत्न राहिला आहे, आणि या प्रयत्नाचा एक भाग म्हणूनच अशा प्रकारचे कार्यक्रम आम्ही मुद्दामहून घडवून आणत असतो. जेणेकरून या विद्यार्थ्यांसमोर अशी आदर्शवत व्यक्तिमत्त्व आणून, त्यांना आपल्याला पुढे काय करायचं आहे, कसं व्हायचं आहे त्याचा एक परिपाठ त्यांच्यासमोर या माध्यमातून निर्माण करण्याचा हा प्रयत्न असतो.

दुसरी एक गोष्ट मला प्रकर्षाने मांडावीशी वाटते ती अशी की सध्या असं एक चित्र निर्माण केलं जात आहे, विशेषत: मराठीतील काही वृत्तपत्रं आणि काही माध्यमांनी असा एक कार्यक्रम राबवलेला दिसतो की विद्यार्थी म्हटला म्हणजे धांगडधिंगा, नाच-गाणं आणि इतर ही अनेक गोष्टी, ज्या करू नये त्या गोष्टींमध्ये तो व्यस्त असतो. मला असं वाटतं हे फारसं योग्य नाही, आणि तशी वस्तुस्थितीही नाही.

आपणास असे निदर्शनात येईल की, या ज्ञानद्वीपामध्ये अनेक विद्यार्थी ग्रंथालयामध्ये बसलेले दिसतात. आपल्या अंगी असलेल्या व्यक्तीमत्वाचा विकास करताना ते दिसतात, आणि नाच-गाण्याच्या पलिकडे ही जाऊन त्यांचे काही ना काही तरी कार्य चालू असतं.

मी एवढंच तुम्हाला आठवण म्हणून सांगेन की नुकतंच भटनागर पारितोषिक आपल्या भारतातल्या विशेष नैपुण्य दाखवलेल्या शास्त्रज्ञांना देण्यात आलं. त्याची बातमी आली. पण त्याची नोंद प्रसार माध्यमांनी नक्कीच मोठ्या प्रमाणावर घेतलेली नाही. अनेक घटना या विज्ञान क्षेत्रामध्ये भारत करत आहे, आपल्या ज्या प्रयोगशाळा आहेत त्या घडवून आणत आहेत.

डॉक्टर म्हणून मला माहीताहे की लसीकरण असो की औषधांचा शोध असो या ज्या काही केंद्र सरकारच्या अंतर्गत असलेल्या प्रयोगशाळा आहेत, त्यांनी अतिशय मोठे योगदान दिलेलं आहे. आज टीका होतेय पण तुम्हाला माहीत असेल की अनेक कार्यक्रम ज्याला मानवी प्रयोग करायला लागतात, हे मोठ्या प्रमाणावर आज भारतात अनेक कंपन्या करीत आहेत. अवकाश क्षेत्रात व अणुक्षेत्रामध्ये भारताने केलेली प्रगती ही तर वाखाणण्यासारखी आहे. १९७४ साली ज्यावेळी पहिला अणुस्फोट झाला, अणुचाचणी झाली तेव्हापासून मला असं वाटतंय की, आपल्यावरती निर्बंध लादलेले आहेत. पण हे निर्बंध असताना सुद्धा भारतीयांनी स्वावलंबनाच्या आधारावर भारतीय शास्त्रज्ञांनी, वैज्ञानिकांनी आपले सर्व अणु कार्यक्रम हे कुठेही बाधा न येऊ देता अजूनपर्यंत चालू ठेवलेले आहेत, ही फार मोठी अभिमानाची बाब आहे. आणि हे सगळे या गेल्या ३० ते ३५ वर्षातील विद्यार्थी, या महाविद्यालयांमधून पुढे आलेले विद्यार्थी यांनी ही सगळी जबाबदारी सांभाळलेली आहे. अवकाश क्षेत्रात भारताचं कार्य हे फार मोठं आहे. भारत हा विकसनशील देश आहे आणि भारतासारखे इतर विकसनशील देश बघता भारताचं या दोन क्षेत्रातील कार्य फार महत्वाचं आहे. पण त्याला पाहिजे तेवढं महत्व आपल्या माध्यमांतून दिले जात नाही. ज्यावेळी शिक्षणाच्या सकारात्मक भूमिकेला महत्त्व दिलं जाईल, त्यावेळेलाच या तरुण पिढीलाही नाच-गाण्याच्या पलिकडे सुद्धा शिक्षण ही काहीतरी सृजनशील गोष्ट आहे, आणि त्याच्यातून आपल्याला काहीतरी मिळवायचं आहे असं वाटायला लागेल. आणि यातूनच या १०० कोटींच्या देशामधून अनेकानेक मोठे शास्त्रज्ञ आपल्याला निर्माण करता येतील.

मित्रहो, आज आपण सर्वजण ही पदविका या मुलांना द्यायला उत्सुक आहोत आणि स्वत: काकोडकरांचं मार्गदर्शनपर भाषण ऐकायला उत्सुक आहोत. माझे सुरुवातीचे हे काही विचार आणि संस्थेची थोडीफार माहिती डॉ. काकोडकरांकरिता देऊन माझे प्रास्ताविक मी येथेच संपवितो.

**डॉ. विजय बेडेकर**

# डॉ. अनिल काकोडकर यांचे भाषण

*५ सप्टेंबर रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या दीक्षान्त समारंभात प्रमुख अतिथी म्हणून डॉ. काकोडकर यांनी व्यक्त केलेले बहुमोल विचार - संपादक*



डॉ. अनिल बेडेकर

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, संस्थेचे ज्येष्ठ सदस्य श्री. करंदीकर, उपस्थित प्राचार्य, आज या पदवीदान समारंभाचे मुख्य मानकरी, ज्यांना पदवी देण्यात आली ते सर्व विद्यार्थी आणि उपस्थित बंधु-भगिनींनो,

सर्व विद्यार्थ्यांचे ज्यांनी आपापले अभ्यासक्रम पूर्ण करून त्यात चांगले यश संपादन करून आज पदविका मिळवल्या त्या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन. या पुढच्या वाटचालीत उत्तरोत्तर आपणा सर्वांना यश मिळत राहो.

विद्या प्रसारक मंडळाचे कार्यक्रम पाहिले. संस्थेतर्फे मला काही माहिति पाठविण्यात आली होती, काही पुस्तके पाठवण्यात आली होती, तेव्हा एक प्रामुख्याने असं जाणवलं की साधारणत: आपण आधी मान्यता मिळवतो, एखाद्या कार्यक्रमासाठी किंवा अभ्यास क्रमासाठी, आणि मग तो सुरू करतो.

मला स्वायत्त संस्था माहीत होत्या पण स्वायत्त अभ्यासक्रम हे थोडं विशेष वाटलं. आणि म्हणून मी सर्वप्रथम या संस्थेचं अभिनंदन करू इच्छितो.

समाजाची, विद्यार्थ्यांची गरज ओळखून त्या अनुषंगाने पाठ्यक्रम तयार करून आणि तशा कार्यक्रमांना इतकी लोकप्रियता मिळवणे हे मला वाटतं एक विशेष आहे. आणि आपण असं म्हणतो की एखादा कोर्स मान्यताप्राप्त आहे की नाही, पण मला असं वाटतं की आज अशी वेळ आली आहे की सरकारमान्यता मिळवण्यापेक्षा समाजामध्ये, उद्योगधंद्यामध्ये किंवा जे एक विस्तारीत Job Market आहे, त्यामध्ये ज्या पदवी/पदविकेला जास्त महत्त्व आहे, ती खरी मान्यताप्राप्त.

आज जे आपण म्हणतो की स्पर्धात्मक वातावरण, यामध्ये जे चांगलं आहे, ज्याची गुणवत्ता उत्कृष्ट आहे अशाच गोष्टी, असेच शिक्षणक्रम तग धरून राहतील, आणि ज्या गोष्टींचा पुढे फारसा उपयोग नाही किंवा ज्यामध्ये Value addition नाही, अशा गोष्टी स्पर्धात्मक वातावरणात आपोआप मागे पडतात. आणि त्या दृष्टीने विशेषत: पाठ्यक्रमाची जी निवड आहे त्याला महत्त्व आहे.

Intellectual Property Rights किंवा Horticulture या दोन विरुद्ध टोकाच्या गोष्टी आहेत. पण त्यांना आजच्या युगात फार महत्व आहे. त्याचं हे महत्व ओळखून आपण इथे जे जे नवीन उपक्रम सुरू केले आणि पुढच्या वर्षातही अनेक काही नवीन उपक्रम सुरू होतील त्याबद्दल मी सर्वांच अभिनंदन करू इच्छितो.

आपण असं म्हणतो की आता हे जे नवीन आर्थिक युग आहे ते ज्याला आपण Knowledge Driven Economy (ज्ञानावर आधारलेलं अर्थकारण) किंवा पूर्वीच्या काळी जसं एकूणच Skills ला महत्व होतं,

श्रमाला महत्व होतं, अजूनही ते महत्व तितकंच आहे. ते कमी झालेलं नाही, पण त्याचबरोबर आता ज्ञानावर आधारलेलं Knowledge Products कुठल्याही गोष्टीत जेवढं, त्याच्या मधले Intellectual content जास्त, तितकी त्या गोष्टींची महती जास्त. आणि आपण हे तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात बघितलं आहेच पण हळूहळू इतर सर्वच क्षेत्रात त्याचं महत्व वाढणार आहे. Skilled Workers च्या ऐवजी Knowledge Workers चं महत्त्व वाढणार आहे.

मला असं वाटतं की, ही आपल्या देशाला एक उत्कृष्ट संधी चालून आली आहे, आणि त्याचे मी थोडे-फार विश्लेषण पुढे करणार आहे.

असं म्हटलं जात की एकूणच आजचं जे आर्थिक दृष्ट्या पुढारलेलं जग आहे.

अमरिका, पश्चिम युरोप किंवा पूर्वेत गेलं तर जपान या सर्व देशात आर्थिक उलाढाली फार मोठ्या प्रमाणात चालू आहेत. पण या सर्व देशांची लोकसंख्या स्थिर झालेली आहे. किंबहुना त्या देशांत तरुण मंडळी फार कमी आहेत. विशेषत: तरुण व शिक्षित मंडळींची तिथे खूप कमतरता आहे आणि म्हणून आपण पाहतो की अशा देशात ते अनाऊन्स करतात की, अमेरिकेने या या क्षेत्रात इतके Visa Permit द्यावचं ठरवलं आहे. किंवा जर्मनीने भारतातील एखाद्या युनिर्व्हसिटीशी करार करून Joined Academic Programme सुरू केले.

## हे सर्व का होतंय ?

हे सर्व अशासाठी होतंय की त्या देशांच्या ज्या काही आर्थिक किंवा इतरही उलाढाली आहेत, तिथला जो कार्यभार आहे तो पुढे नेण्यासाठी त्यांच्याकडे शिकलेली अशी तरुण मंडळीच नाहीत. आणि ही एक नवीन संधी आहे, अर्थात ही संधी सर्व विकसनशील देशांपुढे आहे. पण आपल्या पुढे ही विशेष संधी आहे कारण, आपण जर एकूण जनगणनेचा अभ्यास केला तर आज आणि येत्या काही दशकांपर्यंत भारतामध्ये तरुण मंडळींची संख्या सर्वात जास्त रहाणार आहे. किंवा काही काळ असा असेल की जेव्हा जवळपास अर्धी लोकसंख्या तरुण मंडळींची असेल. आणि एका बाजूने या सर्व लोकांना काम कसे मिळेल, संधी कशा मिळतील हा एक प्रश्न आहे, आणि दुसऱ्या बाजूने जगभर या संधी उपलब्ध आहेत. याच गोष्टीचा आपण कसा उपयोग करून घ्यायचा हा दुसरा प्रश्न आहे. त्या दृष्टीने असे नवीन नवीन जे अभ्यासक्रम आहेत, ज्याच्यामध्ये आपण तरुण विद्यार्थी तयार करतो किंवा केले पाहिजेत.

पूर्वीचा काळ गेला. पूर्वी शाळा-कॉलेजामधून पास झालात की आपण सरकारी नोकरी कुठे मिळते का ते पाहत होतो. त्यादृष्टीने जाहिराती बघायच्या, अर्ज टाकायचे. मला असं वाटतं की आता हळूहळू सरकारी नोकऱ्या कमी होणार आहेत. पण इतर रोजगाराच्या संधी भारतात व भारताच्या बाहेर प्रचंड प्रमाणात वाढणार आहेत. पण त्यासाठी त्या त्या विषयांमध्ये पारंगत असलेली मंडळी आपल्याला हवी आहेत, तशी ती शिक्षण संस्थांमधून बाहेर पडली पाहिजेत. आणि ही जी सांगड घालण्याचं काम आहे, हे ज्या शिक्षणसंस्था किंवा जी तरुण मंडळी आधी ओळखतील ती अर्थातच या स्पर्धात्मक युगात अधिक पुढे राहतील. आणि त्या दृष्टीने त्यांचा फायदा पण जास्त होईल.

शिक्षण जर चांगल्या पद्धतीने नाही झालं तर, अर्थातच शिक्षणाचा दर्जा नसला तर, किंवा विद्यार्थी नवीन आव्हाने पेलण्यास पात्र नसतील तर प्रगतीचे इंजिन होण्यापेक्षा ते रेल्वेचे डबे म्हणजेच ज्यांनी चांगल्या प्रकारे शिक्षण प्राप्त केलंय ते अशी नवीन आव्हाने पेलू शकतात. असं शिक्षण प्राप्त केलं तर हे युवक विकासाचे इंजिन होतील आणि देशाचा विकास घडवून आणतील पण तसं जर नाही झालं तर मग अर्थातच भार बनतील आणि ज्या अर्थी

आपल्या देशात तरुण मंडळींची संख्या जास्त आहे, तर हे एक एकदम सक्षम Engine होऊ शकतं, नाहीतर तितकाच भार पण होऊ शकतं. So its a great challenge & great threat & the choice depends on the education institutions & the students. हा पहिला मुद्दा मला आपल्या समोर ठेवावासा वाटतो की, आता अशी वेळ येऊन ठेपली आहे की आपण अशी तरुण मंडळी तयार केली पाहिजेत, जी who are impower to carry out whatever challenges that come before them.

आता हे जे Impowerment आहे, हे व्हायचं म्हणजे काय, कसं व्हायचं ?

मला असं वाटतं की ज्याला आपण समृद्ध शिक्षण किंवा good quality education म्हणतो, यात ३ भाग आहेत. आणि जर हे ३ ही भाग चांगल्या प्रकारे पुढे नेले गेले तरच ते शिक्षण समृद्ध म्हणता येईल किंवा तसं शिक्षण ज्या योगे विद्यार्थी they themself feel impowerd.

तीन भागातला पहिला भाग अर्थातच ज्ञान (knowledge). हा शिक्षणाचा सर्वात महत्त्वाचा भाग झाला. असं म्हणतात की ज्ञान ही इतकी महत्त्वाची गोष्ट आहे की ज्याला Knowledge for knowledge sake (ज्ञानार्जन करणं व विद्वत्ता प्राप्त करणं) म्हणतात.

हे आयुष्याचं एकमेव ध्येयं असू शकतं. आणि आपल्या देशात याची फार मोठी परंपरा आहे. पण जर ते तेवढ्यापर्यंत मर्यादित राहिलं आणि त्याबरोबर जे दुसरे दोन भाग आहेत.

दुसरा भाग म्हणजे Skills. कोणत्याही समाजात ज्या वेगवेगळ्या प्रक्रिया असतात मग त्या कोणत्याही म्हणजे they could be technological skills, they could be business skills, they could be skills related to social enginnering.

पण त्या Skills प्राप्त करणे हा एक शिक्षणाचा महत्वाचा भाग आहे. काही कारणाने आपल्या इथे जी समाज रचना निर्माण झाली त्यामध्ये knowledge आणि Skills यामध्ये दरी निर्माण झाली. त्यामुळे ज्यांना ज्ञान आहे ते Skills च्या दृष्टीने कमी पडतात आणि ज्यांना Skills आहे ते ज्ञानाच्या दृष्टीने कमी पडतात. ही परिस्थिती आजच्या दृष्टीने फारच धोकादायक आहे. कारण आपण Knowledge driven economy जर म्हटलं, तर केवळ ज्ञान असून उपयोग नाही. तर त्या ज्ञानाचा कसा उपयोग समाजासाठी, उद्योगांसाठी करायचा त्यासाठी Skills असणे तितकंच आवश्यक आहे. आणि skills आणि knowledge मध्ये ज्या भिंती आहेत त्या पूर्णपणे कोलमडल्या पाहिजेत. त्याचबरोबर शिक्षणात दोन्ही गोष्टी पूरक समजून विद्यार्थी दोन्ही गोष्टीत पारंगत झाला पाहिजे. आणि अर्थकारणाच्या दृष्टीने मला वाटतं की या दोन्ही गोष्टी आल्या की, पैसा कमविण्याच्या दृष्टीने चांगली तयारी होईल.

पण त्याचबरोबर तिसरी गोष्ट ही तितकीच महत्त्वाची आहे. ती म्हणजे Values (मूल्य) प्रत्येकाला स्वत:ची मूल्ये असायला हवीत, की ज्या योगे कोणती गोष्ट बरोबर, कोणती चूक, काय चांगलं-काय वाईट याचा सारासार विचार प्रत्येकजण आपापल्या मूल्यानुसार करू शकला पाहिजे. आणि ते जर झालं तरच समाजाचा समतोल, समाजाची वाटचाल योग्य दिशेने होईल. आणि म्हणूनच कोणत्याही प्रकारचं शिक्षण असो मग ते Primary असो Secondary असो किंवा Tetiary असो त्या तिन्हींचा मिलाप असणं आवश्यक आहे. पण जसजसं Knowledge Product चं महत्त्व वाढेल (ते वाढणारंच आहे हे मला वाटतं) तितकंच जास्त महत्वपूर्ण ठरेल. त्या दृष्टीने शिक्षण क्षेत्रात जे बदल करायचे ते जितक्या लवकर होतील ते तितके चांगलं.

शेवटचा एक मुद्दा मी आपल्यासमोर ठेवून भाषण संपवणार आहे, आणि ते म्हणजे आपण शिक्षण प्राप्त करतो, आणि मी असं म्हटलं की if youth are impower

ते स्वत:ची प्रगतीही आपापल्या तयारीवर करू शकतील आणि त्याचबरोबर स्वत:ची, कुटुंबाची, समाजाची व देशाची प्रगती ह्या ऐकमेकांवर परस्पर अवलंबून गोष्टी आहेत, आणि साहाजिकच जेव्हा हे सर्व जनसंख्येबद्दल घडतं तेव्हाच असं म्हणता येतं की तंत्रज्ञानामुळे आज हिंदुस्थानचा डंका संबंध जगभर वाजतोय. कारण आपण तंत्रज्ञानात तज्ज्ञ मंडळी भराभर निर्माण करू शकलो. ती मंडळी जगभर पसरली आणि त्यांच्या कामाच्या Impact मुळे आज जगभर भारताचा बोलबाला झाला. आता त्यातील बरीच मंडळी देशाबाहेर आहेत, देशातही आहेत. आणि आपण बघत असाल गेल्या ८ ते १० वर्षात एक नवीन गोष्ट आपल्या लक्षात येते की आजकाल आपली बरीचशी विद्यार्थी मंडळी परदेशात स्थान प्राप्त करून आहेत. IIT मध्ये आपण ऐकलं असेल की IIT alumni मंडळींनी जेवढी Investment केली, जेवढे आर्थिक सहाय्य IIT ला केलंय, ही एक अनन्य साधारण गोष्ट आहे. म्हणजेच कित्येक कोटींचं सहज आर्थिक साहाय्य माजी विद्यार्थ्यांकडून होतंय ही एक चांगली गोष्ट आहे.

गुरूने आपल्याला शिकवलं, समाजात पुढे आणलं आणि शेवटी त्याची परतफेड अल्पशा प्रमाणात का होईना पण गुरूदक्षिणा म्हणून आपण करतो. आपली ती परंपराच आहे. त्याचंच हे रूप आहे असं मला वाटतं.

आणि ही जी भावना आहे, ती प्रत्येक विद्यार्थ्यात असावी. आर्थिक मदत असंच नाही पण आपली जी प्रगती झाली, आपण चांगलं काम केलं या मागे आपलो जो बेस आहे तो कशाने निर्माण होतो हे लक्षात घ्यावं. ते आपले माता-पिता, गुरुजन, ज्या संस्थातून आपण शिकलो. त्या संस्था किंवा आपल्या आसपासचे लोक या सर्वांच्या पाठबळावर माणूस वर येत असतो. आणि म्हणूनच प्रत्येकाला ते ऋण सतत जाणवत रहावला पाहिजे.

महात्मा गांधींनी म्हटलं की, कोणाकडे किती ही संपत्ती असली, तरी ती त्याने समाजाचा ट्रस्टी म्हणून ती त्याच्याकडे आहे असं मानावं. आणि त्या संपत्तीचा विनियोग एक ट्रस्टी या भावनेतून करावा. अशी जर भावना प्रत्येकाने रूजवली तर मला वाटतं प्रत्येक समाजात विषमता ही असतेच. त्यामुळे समाजात कुणाला ना कुणाला आर्थिक हातभार मिळण्याची किंवा देण्याची गरज असते. आणि अशा या ट्रस्टीशीप च्या भावनेमुळे ज्यांना मदत मिळणे आवश्यक आहे. त्यांना मदत मिळणे सुकर होते.

आणि म्हणून मला असे वाटते की, एक जबाबदार नागरिक म्हणून, एक चांगला शिक्षित मनुष्य म्हणून ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, की आपण जे काही शिकलो, जे काही प्राप्त केलं, Treat that as next as your ownership, but as your trustship आणि त्याचा उपयोग त्या दृष्टीने जर केला तरच हे महत्वाचे ठरेल. समाजाचं देणं जेवढं काही शक्य आहे ते परत करण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे.

You creat a much base from which the country can launch to much higher level at a much faster rate.

आणि मला असं वाटतं की आपण सर्व विद्यार्थी मंडळी जी आज इथे ज्यांना पदविका मिळाली ते, सर्वजण अशीच भावना मनात बाळगतील. आपली उत्तरोत्तर प्रगती करत राहतील, आणि त्या प्रगतीच्या आधारे अर्थातच स्वत:चं, कुटुंबाचं, समाजाचं आणि देशाचं भलं साध्य करतील.

आणि या कार्यात आपणा सर्वांना यश मिळो, हीच माझी, शुभेच्छा धन्यवाद !

**डॉ. अनिल काकोडकर**

अध्यक्ष, अणुउर्जा आयोग

# एका उज्ज्वल शैक्षणिक युगाची इतिश्री

*१ ऑगस्ट १९२० हा लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीचा दिवस. ठाणे येथील विद्याप्रसारक मंडळाच्या वर्धापनाचा दिवस या दृष्टीने हि हा दिवस महत्त्वाचा ठरतो. ठाणे जिल्ह्यातील दिवंगत शिक्षण महर्षी डॉ. वा. ना. बेडेकर यांनी सन १९८० मध्ये म्हणजे २५ वर्षांपूर्वी समाजातील विचारवंतांचे एक भव्य शैक्षणिक स्वप्न पाहणारी, एक कविता लिहिली होती; 'नवमानव, नवनागरिक प्रयत्नीं इथे घडतसे, सत्य शिव सुंदर जयांचे अणुरेणीं वसे' हे साकारण्यासाठी 'नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा' ही मङ्गल अभिलाषा व्यक्त केली होती. त्यांच्या शिल्पाकृतीचे अनावरण हा मुहुर्त साधून बेडेकर महाविद्यालयाच्या सर्व सहकाऱ्यांच्या मध्यभागी डॉ. विजय बेडेकर, श्री. पानसरे आणि शिल्पकार श्री. भाऊ साठे यांच्या हस्ते संपन्न झाले. या सोहळ्यासाठी लेखक उपस्थित होते हे त्यांच्या गेल्या पाच दशकांच्या स्नेहाला साजेसेच झाले. या निमित्ताने 'एका उज्ज्वल शैक्षणिक युगाची इतिश्री' ही त्यांनी वाहिलेली स्मृतिरुपी आदरांजली! - संपादक*

ठाणे येथील विख्यात शिक्षण महर्षी व नावाजलेले डॉक्टर वा. ना. बेडेकर यांची प्राणज्योत बुधवार दि. १४ एप्रिल रोजी डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीच्या दिवशी दुपारी २.३० वाजता मालवली आणि ठाण्यातीलच नव्हे तर ठाणे जिल्ह्यातील एका उज्ज्वल शैक्षणिक युगाची इतिश्री झाली असेच म्हणणे योग्य ठरेल.

मुंबई, राजापूर आणि कोचीन अशा तीन ठिकाणी पेढ्या चालवणारे बेडेकरांचे घराणे. यांचे वडील दणकट उंच, सूर्योपासक, भरदार देहयष्टी असलेले, फणसवाडीत राहणारे परंतु यांची प्रकृती मात्र तोळा-मासा. साहाजिकच प्रकृती सुधारावी म्हणून गोवळला यांना मामांकडे पाठवले. ते खरेखुरे देशभक्त, परदेशी वस्तूंचा व्यवहारातील वापर टाळण्यासाठी एका लांबच लांब शाकारलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये स्वत: लोहार काम करून वस्तरे आणि चाकू बनवण्याचा कारखाना चालवणारे, दुपारी शालेय शिक्षणापैकी गणित व भाषा यांचे भाच्याला शिक्षण देणारे चार पाच एकराच्या शिवारात भातशेती करणारे, आंब्यांची झाडे बाळगून असलेले, या नैसर्गिक वातावरणात भाच्याचे शारीरिक आणि मानसिक आरोग्यही सुधारले. परन्तु थोड्याच काळात 'बॅसिलरी डिसेंट्री' मुळे सुप्रसिद्ध डॉक्टर आणि कुशल वैद्य यांच्या उपचाराला दाद न देता वडील मृत्यमुखी पडल्यामुळे त्यांना आपली आई व धाकटा भाऊ यांना घेऊन मुंबई सोडावी लागली व गोवळला स्थलांतर करावे लागले. या काळात त्यांच्या आईला बेडेकरांच्या संयुक्त कुटुंबाचा आधार मिळाला.

राजापूरच्या त्या काळी प्रसिद्ध असलेल्या शाळेतून मॅट्रिक झाल्यानंतर पुढे शिकायचे कसे, हा प्रश्न निर्माण झाला. दैवयोगाने मुंबईच्या ब्राह्मण सभेची दरमहा रू. १५०/- ची शिष्यवृत्ती मिळाल्यामुळे ही चिंता मिटली, त्या काळी शिक्षण संपेपर्यंत न चुकता दरमहा रू. १२ची मनीऑर्डर पाठवणाऱ्या मेव्हण्यांचाही आधार मिळाला. चार दिवस उपाशी रहावे लागले. त्या वेळी घरमालक आपटे यांनी रु. १०/- देऊन जेवणाची सोय केली व यांनी खेडोपाडी ग्रामोफोनच्या माध्यमातून शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी ग्रामोफोन रेकॉर्डला लागणारे संवाद लिहिण्याचे काम उपलब्ध करून दिले. इंटर सायन्स झाल्यावर

मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या राखीव जागा न भरल्यामुळे त्यांना वैद्यकीय शाखेत प्रवेश मिळाला. या योगाचे आज नवल वाटते. त्या काळच्या विद्यार्थी जगतात त्यांनी आपल्या सफाईदार इंग्रजी बोलण्याच्या शाळेतल्या सवयीमुळे आणि सभाधीटपणामुळे नाव मिळवले होते, मॅगझीनचे सेक्रेटरीपद ही संभाळले आणि दीर्घोद्योग आणि एकाग्रतेने प्राध्यापकांच्या वर्गात उपस्थित राहून ज्ञानाचे कण वेचणे यांच्या या गुणांच्या जोरावर पहिल्या परीक्षेतच त्यांनी कॉलेजला डॉ. डी. मान्टे प्राइझ, डॉ. शिल्डर प्राइझ आणि लोकमान्य टिळक प्राइझ ही बक्षिसे मिळवून दिली.

पुढे वैद्यकीय परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर डॉ. बेडेकरांनी उंबरगावला प्रॅक्टिस सुरू केली आणि अडचणी नी खचून न जाता ताठपणे उभे रहाण्याच्या मूलभूत मनोवृत्तीच्या जोरावर चांगला जमही बसविला. समाजाबद्दलच्या आस्थेमुळे तत्कालीन परिस्थितीत भूमिगत राहून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना साहाय्यही केले परंतु कोणीतरी दवाखान्यावर तिरंगा ध्वज फडकवल्यामुळे आणि पोलिस इन्स्पेक्टर कडून पकड वारंटाची धमकी मिळाल्यामुळे त्यांनी उंबरगाव सोडून मुंबईला आत्याकडे रहायला सुरुवात केली. या काळात ज्ञानसागर लिथो प्रेसचे मालक श्री. केशव गणेश उर्फ बाबूराव जोशी यांच्या मुलीशी यमूताईशी त्यांचा विवाह झाल्यामुळे त्यांनी पुन्हा उंबरगावला डॉ. रामभाऊ जोशींकडे पगारी सहायक प्रॅक्टिस सुरू केली. तेथील लोक जोडलेले होतेच. तथापि, १९४२-४३ पासून आस्था. या बाबतीत त्यांनी पैसा काढण्याची वृत्ती कधीही ठेवली नाही असा माझ्या अनेक ठाण्यातील मित्रांचा अनुभव आहे.

अर्थात हा अनुभव येण्याचे कारण सन १९५२ मध्ये मी त्यांच्या नारायण भुवनात पहिला भाडेकरू म्हणून रहायला आलो. परंतु त्यांच्या सौजन्यपूर्ण वागणुकीने मी त्यांच्या घरातला होऊन गेलो. सौ. यमूताई या तर माझ्या पत्नीची मैत्रीण या नात्याने वागू लागल्या. त्या वेळी चि. शैला, विजय व माणिक ही शाळेत जाणारी मुलेच होती; यांच्यामुळे आमचा घरोबा वाढला आणि तो आजतागायत कायम आहे. मध्यंतरी पालघर व डॉ. येथील महाविद्यालयाच्या जबाबदारीच्या काळात अंतरामुळे थोडासा अंतराय निर्माण झाला. परंतु आमचा स्नेह पूर्वीच दृढमूल झालेला असल्यामुळे त्यांत खण्ड पडला नाही.

नारायण भुवनमध्येच असल्यामुळे डॉक्टरांनी निर्माण केलेल्या सर्व शैक्षणिक संस्थाची मी सुरुवातीपासून साक्षीदार आहे. डॉ. बेडेकर विद्यामंदिराच्या कार्यकारिणीचा मी सुरुवातीपासूनचा सदस्य आहे. के. जी. कला आणि एन. जी. बेडेकर वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी माझी नेमणूक करावी अशी त्यांची इच्छा अनेक वेळा बोलून दाखवली. प्रारंभीचे प्राचार्य बेडेकर ही संस्कृतचेच असल्यामुळे ते शक्य झाले नाही व सुरुवातीपासूनच संकल्पित माझा संबंध साकार होऊ शकला नाही. बाबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. कै. सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमाची शाळा, वि. प्र. मंडळाचे तंत्र निकेतन, औद्योगिक व्यवस्थापन विभाग त्या सर्व संस्था समाजाच्या शिक्षणाबद्दल अभिजात आस्था बाळगणाऱ्या त्यांच्या व्यक्तिमत्वाचेच अविष्कार; कै. बाळकृष्ण नाईक बांदोडकर महाविद्यालयासाठी कै. भाऊसाहेब बांदोडकरांची देणगी मिळवण्याचे त्यांचेच कौशल्य. योग्य माणसांची पारख करून त्यांना शैक्षणिक कार्यात गुंतवून टाकण्याचे त्यांचे कसब खरोखर वाखाणण्यासारखे होते. आपल्या संस्थांमधील शिक्षक, प्राचार्यच नव्हे तर कार्यकर्ते यांच्याबद्दल जिव्हाळ्याने लिहिणाऱ्या त्यांच्या प्रवृत्तीमुळे, 'स्मृतिलहरी' हे त्यांचे ८० व्या वर्षी प्राचार्य चिटणीस यांच्या शब्दाङ्कनातून प्रसिद्ध झालेले पुस्तक वाचनीय झालेले आहे.

व्यक्तिशः माझ्याबद्दलचा त्यांचा स्नेह हा आपुलकीच्या भावनेने भिजलेला आहे. मी तुम्हाला सोयीस्कर आणि लहान जागेअभावी ठाणे सोडू दिले, ही माझी चूकच झाली हे ह्यांनी मोकळेपणाने कबूल केले. या



### डॉ. वा. ना. बेडेकर यांचे स्मृती स्मारक

तसे पाहिले तर कौटुंबिक स्नेहापोटीच ते चि. माणिकच्या विवाहाचे निमंत्रण द्यायला माहीमला घरी आले होते. 'हिन्दी सेवेकरी' या मालेत माझा परिचय पाहिल्याबरोबर ते वेळात वेळ काढून माझ्या म्हणजे व्यवहाराच्या दृष्टीने भाडेकरूच्या घरी अभिनंदन करण्यासाठी सकाळीच हजर झाले होते!

त्यांचे आलीशान नारायण भुवन बांधण्यात नैसर्गिक पाण्याच्या अभावाची फार मोठी अडचण होती. २५-३० मिनिटे हातपंप चालवला की पाणी संपायचे. व्यक्तिश: मी सुद्धा सुरुवातीला पाणी हपसूनच स्नान करीत होतो. हजार फूट अंतरावर असलेल्या नाईकवाडीला भरपूर पाणी असलेले बघून त्यांनी नाईक वकिलांना भेटून पंपाने पाणी घेण्याची परवानगी मागितली व त्यांनी ही स्वामित्वाचा एक रुपया घेऊन ती देऊन टाकली. हा त्यांचा उदारपणा खरा पण क. ख. ग. ला हे जमले नसते; 'बल ज्याचे त्यास ते' हेच खरे. पुढे म्युनिसिपालिटीचे पाणी नळ आल्यानंतर हा प्रश्न सहज मिटला पण 'कृतमुपकारं साधवो न विस्मरन्ति' या नुसार त्यांनी नाईक वकिलांबद्दल कृतज्ञता 'स्मृतिलहरी'त व्यक्त केलेली आहे.

भारत सहकारी बँकही त्यांनी सामान्य माणसाच्या सोयीसाठी निर्माण केली. आज या बँकेच्या अनेक शाखा आहेत. आणि कित्येकांच्या उपजीविकेचा मार्ग प्रशस्त झाला.

संगीताबद्दलचे त्यांचे प्रेम ठाणेकरांना माहीत आहे. त्यांच्यामुळेच सितारवादक रविशंकरांसारखे, भीमसेन जोशीं-सारख्या दिग्गजांच्या स्वर्गीय कलानैपुण्याचा आस्वाद ठाणेकरांना घेता आला हे विसरून कसे चालेल?

समाजाच्या सेवेसाठी निरलसपणाचे काम करणाऱ्या या देवमाणसाचा देव आणि दैव यांवर मात्र विश्वास नव्हता. मनुष्याच्या प्रयत्नावर होता. व्यवसायात निरलसपणाने केलेल्या प्रसंगी शरीराचीही काळजी न करणाऱ्या या व्यक्तीला एका महिन्यासाठी घराला कुलप लावून भाजेकर हॉस्पिटलमध्ये आणि नंतर हवापालटासाठी माथेरानला जावे लागते, परंतु तिकडून परतल्यावर लोक त्यांची आतुरतेने वाट पहात असल्याचे आढळून आले, यात नवल नाही. 'फॅमिली डॉक्टर' ही संस्था त्यांनीच टिकवली होती, आता समाजातूनच ती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

व्यवसायाच्या बाबतीतली त्यांची निष्ठा शाळा, महाविद्यालये आणि बँक यांच्या दरमहा होणाऱ्या सभांना नियमाने उपस्थित रहाण्यातही प्रकर्षाने व्यक्त झाली. समाजासाठी केलेले काम कमीच आहे असे समजून त्यांनी काही महिन्यापूर्वी 'सत्कर्म-प्रतिष्ठान' ही नवी संस्था निर्माण करून संस्थेतर्फे सरकारकडून न गौरवलेल्या समाज-प्रेमींचा सत्कार करण्याची योजना आखली. क्रियेवीण वाचाळता त्यांनी व्यर्थच मानली. थोडे पण मुद्देसूद आणि मार्मिक बोलण्याचा त्यांचा शिरस्ता होता. त्यामुळे आज ठाणेवासियांनाच नव्हे, तर माझ्यासारख्या त्यांच्या पन्नास वर्षे स्नेहभावाने कृतार्थ झालेल्या व्यक्तींना ही पदोपदी एक पर्व संपल्याची तीव्रतेने जाणीव होते आणि He had no business to die so soon असे म्हणावेसे वाटले तर नवल नाही.

**डॉ. मो. दि. पराडकर**

# श्री मध्वाचार्य आणि द्वैत संप्रदाय

*मध्वाचार्य आणि द्वैत संप्रदायाबद्दल अभ्यास असणारा हा लेख आहे. मध्वाचार्यांना वासुदेवाचा अवतार मानतात. त्या दृष्टीने लेखात विचार मांडलेला आहे. - संपादक*

## वासुदेवाचा अवतार

श्रीमत् आनंदतीर्थ ऊर्फ मध्वाचार्य यांना वासुदेवाचे अवतार मानण्यात येते.

प्रथमो हनुमान् नाम द्वितीयो भीम एवच

पूर्णप्रज्ञ: तृतीयस्तु भगवत् कार्य साधक:।

वासुदेवाचा पहिला अवतार हनुमान, दुसरा भीम, व तिसरा पूर्ण प्रज्ञ म्हणजे मध्वाचार्य होत. मध्वाचार्यांचे अत्यभ्दुत सामर्थ्य पाहून त्यांच्या एकनिष्ठ शिष्याने, त्रिविक्रम पंडिताचार्य याने, त्यांना वासुदेवाचे अवतार असे ठरविले आणि गुरूंना उद्देशून वायुस्तुती नावाचे स्तोत्र रचिले. एकदा हे पंडिताचार्य आपल्या गुरूबरोबर बदरी यात्रेला गेले होते, तेथे मार्गात एका मुख्य प्राणाचे देवालयात मध्वाचार्य ध्यानस्थ बसले. त्या वेळी पंडिताचार्यांना आपले गुरू हनुमत् तदाकार झाल्याचे पाहिले. हे पाहताच वरील स्तोत्र लिहून त्यांची स्तुती केली. त्यांचा जन्म शके ११३१ आश्विन शु. १० दुपारी बारा वाजता झाला. आश्विन शुक्ल दशमी दिवसे पाजकारण्ये शुचिक्षेत्रे बुधवासरे मध्यान्ह वेळायां जात: ।

## आईवडिल

शितवल्ली या गांवी पुराणकथा सांगून आचार्यांचे आईवडिल उपजीविका करीत असत. श्री हरीच्या सेवेत जे सहज मिळेल त्यात संतुष्ट वृत्तीने राहात होते. आचार्यांच्या वडिलांचे नाव मध्यमगेह भट व आईचे वेदवती असे होते. वडिलांचे नांव नारायणाचार्य असावे असे सांगण्यात येते. ते मध्य आळीत राहात यामुळे त्यांना मध्यमगेह भट असे लोक म्हणत. त्यांची उपजीविका मोठ्या कष्टाने चाले. पतीच्या स्वभावाला अनुरूप पत्नी असल्याने घरात सुख समाधान होते. दारिद्र्यातही त्यांच्या घराला नंदनवनाचे रूप आले होते. नारायणाचार्य शास्त्रात पारंगत होते. भट्ट ही उपाधी विद्वत्ता दर्शक आहे. मध्वाचार्यांच्या आधी त्यांना दोन मुले झाली. परंतु ती अल्पायु ठरली. त्यामुळे संसारात औदासीन्य पसरले. शिववल्ली गांवात त्यांना आता करमेना म्हणून तो गांव सोडून नारायणाचार्य पाजक क्षेत्री रहावयास आले. उडुपी या गांवापासून हे क्षेत्र आठ मैलांवर आहे. सांप्रत या ठिकाणी वस्ती नाही. फक्त एक जुनाट घर आहे. हेच मध्वाचार्यांचे जन्मस्थळ. या जागेचे रक्षण उडुपी येथील आठ मठांपैकी काणूर मठाकडून होत असते. या पांजक क्षेत्राच्या आजूबाजूस परशुरामतीर्थ (धनुतीर्थ) शरतीर्थ, अंबुतीर्थ, परशुराम तीर्थ, व गदा तीर्थ अशी पांच तीर्थे आहेत. खुद पाजक क्षेत्रात श्री मध्वाचार्यांनी निर्माण केलेले वासुदेव तीर्थ आहे. या तीर्था जवळच एका शिलेवर आचार्यांच्या पावलांचे ठसे उमटले आहेत. या क्षेत्राजवळ उद्यावरम् नावाचे एक खेडे आहे. आचार्यांनी आपल्या दंडाने निर्माण केलेले दंडतीर्थ इथे आहे. या तीर्थातील पाणी दुष्काळातही आटत नाही असे सांगितले जाते.

## अनंताची उपासना

पाजक तीर्थ फार मोठे गाव नव्हते. नारायणाचार्यांची उपजीविका चालू शकेल असे गाव होते. तिथे पाठशाळा होत्या. विद्वानांचा आदर होत असे. मध्वाचार्यांच्या

पूर्वीपासूनच श्रीमत् आद्य शंकराचार्य यांनी पुरस्कारलेल्या मायावादाला लोक कंटाळलेले होते. पुढील काळात श्री रामानुजाचार्यांनी पुरस्कारलेल्या विशिष्टा द्वैत मताबद्दलही तीच अवस्था झाली होती. मायावाद मनास पटत नव्हता पण पूर्वसंस्कारामुळे त्याचा त्यागही करवत नव्हता. अशी अनेक विद्वानांची स्थिती झालेली होती. त्यातून आपणाला पुत्र संतान नाही याची जाणीव नारायणाचार्यांना वारंवार होऊ लागली. त्यांच्या मनाचे स्वास्थ्य नाहीसे होऊ लागले. मानवी प्रयत्नांची पराकाष्ठा झाली म्हणजे मानव देवाकडे धाव घेतो. आचार्य श्री हरीची उपासना करू लागले. उडुपी येथील अनंतेश्वराची उपासना सुरू केली. उभय पतिपत्नीने बारा वर्षे अखंडपणे उपासना केली. कर्दम, पराशर, अत्रि, इत्यादी ऋषींना श्रीहरीच्या सेवेमुळेच जगदुद्धारक असे पुत्र झाले. त्या प्रमाणेच अनंतेश्वराच्या कृपाप्रसादाने नारायणाचार्यांना एक पुत्र रत्न झाले. मुलाचे नाव वासुदेव असे ठेविले.

### बालपण

उपासनेच्या प्रभावामुळे आपणाला पुत्र झाला म्हणून आपण मुलासह अनंतेश्वराच्या दर्शनास जावे असे नारायणाचार्यांना वाटले, देव दर्शन घेऊन परतत असताना एक मोठे संकट उपस्थित झाले. एका पुरूषाला ब्रह्मसंमधाने झपाटले. त्याला रक्ताच्या उलट्या झाल्या. सर्वांच्या तोंडचे पाणी पळाले. तो माणूस बडबडू लागला. हा वासुदेव बरोबर आहे म्हणून मी काही त्रास देणार नाही. थोड्या वेळाने त्या माणसाची संमधापासून सुटका झाली. आणि सारे वातावरण निवळले, सर्वांनाच मोठ्या संकटातून वाचलो असे वाटले. वासुदेव जात्याच बाळसेदार, तो सतेज आणि हसतमुख होता. त्यामुळे सगळेच त्याला उचलून घेत व लाड करीत, मात्र वेदवतीची त्या बाळावर सतत नजर असे.

बालक मोठे झाले त्याबरोबर हूड स्वभावही वाढीला लागला. वेदवती सतत काम बाजूला ठेवून वासुदेव काय करतो हे पाहात असे. थोडेसे दुर्लक्ष होण्याचा अवकाश वासुदेव धूम ठोकून पसार होत असे. एकदा एका उन्मत्त पोळाने गावात बराच धिंगाणा घातला. आणि रानात निघून गेला. वासुदेवही त्याच्या बरोबर लोंबकळत गेला. ही बातमी गुराख्याने वेदवतीला दिली. हे ऐकताच सारा गाव लोटला. त्यावेळी वासुदेव तेथे खेळत बसला होता. ती मुलाला घेऊन आली. एकदा नडुवेरी या गावी आपल्या आप्तातल्या घरी लग्नानिमित्त नारायणाचार्य सहकुटुंब गेले. सोहळ्यात आई दंग आहे असे पाहून वासुदेव बाहेर पडला. व चालत उडुपीला जाऊन पोहोचला. मुलगा नाहीसा झालेला पाहून एकच हलकल्लोळ झाला. वडिलांनी शोध घेतला. कदाचित ही स्वारी उडुपीला गेली असेल असे वाटून ते तिथे आले, तेव्हा वासुदेव त्यांना देवळात दिसला. त्याला घेऊन वडील परतले.

### हुषार बुध्दिमत्ता

एकदा वेदवती आपल्या भावाकडे नैयमपल्ली इथे गेली. कुठेही गेली तरी पुराणश्रवण ती करीत असे. वासुदेवाला बरोबर घेऊन ती पुराणाला गेली. पुराण ऐकत असताना या बालकाने पुराणिक बोवाना - 'आपण अर्थ चुकीचा सांगता आहात' असे म्हणून अडविले. वेद व्यासाना अभिप्रेत असलेला अर्थ हा आहे असे सांगताच जमलेल्या मंडळींनी त्या बालकाची प्रशंसा केली. लहानपणीच त्याची मति व्युत्पन्न असलेली आढळते.

### उपनयन

एका शुभ मुहूर्तावर वडिलांनी आपल्या मुलाचे उपनयन केले. आणि धर्मशास्त्राप्रमाणे वेदाध्ययन सुरू झाले. हूड स्वभाव असल्याने आपला अभ्यास आटोपताच वासुदेव खेळत राही. लांब उडी, उंच उडी, नदीत वा सरोवरात पोहणे, इत्यादीत वासुदेव पटाईत होता. तो उत्तम प्रकारे कुस्ती खेळत असे. अशा प्रकारे वासुदेव सतत खेळात गर्क राही. हे पाहून गुरुजी रागवत. अशा प्रसंगी आपल्याला

दिलेले पाठ गुरूजींना तो अचूक म्हणून दाखवी. त्याच्या या अलौकिक बुद्धिमत्तेबद्दल त्यांची खात्री झाली. ते त्याला एकट्यालाच पाठ देऊ लागले. त्याचा परिणाम असा झाला की अल्प काळात संहिता, पद, ब्राह्मण क्रम, जटा आतिदान आदी पाठ तसेच न्यायशास्त्र आदींत वासुदेव तरबेज झाला. त्याची ती विलक्षण बुद्धिमत्ता पाहून हा मुलगा कोणीतरी असमान्य असावा असे गुरूजींना वाटत असे.

### दैवं अन्यत् चिंतयेत् ।

मुलगा शिकून गुरु गृहाहून परतला. विद्वान झाला. आईबापांना अतिशय आनंद झाला. आता त्याचे चार हात करावे व संसाराला लावावे. मग आपला वृद्धापकाळ सुखात घालवावा असे त्यांना वाटू लागले. पण विधिघटना वेगळीच होती. वासुदेवाच्या मनात नेमके याच्या उलट विचार येत. आपण ज्या कार्यासाठी जन्म घेतला आहे. ते कार्य गृहस्थाश्रम स्वीकारून करता येणार नाही. त्या करता मला संन्यासच ग्रहण केला पाहिजे. संन्यास ग्रहणाचा निश्चय त्याने पक्का केला. एके दिवशी कुणाला न कळवताच गुरूच्या शोधार्थ बाहेर पडला. रजतपीठपूर इथे कोणी संन्यासी आले आहेत असे ऐकून तो तिकडे गेला. त्या ठिकाणी अच्युतप्रेम या नावाचे यति अनंतेश्वराची उपासना करीत राहिले होते. त्यांचेकडे येऊन अत्यंत आदराने प्रणिपात केला आणि मला संन्यास दीक्षा द्यावी अशी प्रार्थना केली.

### संन्यास ग्रहण

वासुदेव उडुपी येथे अच्युतप्रेक्षाकडून संन्यास दीक्षा घेण्यासाठी गेला आहे, हे कळताच नारायणाचार्य धावत तिथे आले. वासुदेवाच्या दृढ निश्चयापुढे त्यांचा काही इलाज चालेना. ते निराशेने परतले. ही गोष्ट त्यांच्या मनाला लागली, अन्न गोड लागेना, बेचैनी वाटू लागली. म्हणून आपल्या पत्नीसह ते पुन: एकवार उडुपीला आले, तेव्हा वासुदेव त्यांना म्हणाला आपणाला आणखी एक मुलगा होईल. तो वृद्धापकाळी आपली काळजी घेईल. तरी मला संन्यास ग्रहण करण्याची अनुज्ञा असावी. त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना मुलगा झाला. मातापितांच्या अनुज्ञेने अच्युतप्रेक्षा कडून वासुदेवांनी संन्यास दीक्षा घेतली. अच्युत प्रेक्षांनी त्याचे नांव पूर्ण प्रज्ञतीर्थ असे ठेविले. वासुदेवांनी कोणत्या साली संन्यास घेतला यावर वादंग आहे. त्यांचा जन्म शके ११२१ आणि शके १२१६ साली ते बदरीकाश्रमी अदृश्य झाले. एकूण ९५ वर्षे या भूतलावर त्यांचे वास्तव्य होते. पैकी ८० वर्षे ते पीठावर होते यावरून शके ११३६ साली म्हणजे वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांनी संन्यास घेतला असावा असे म्हणावे लागेल. अच्युत प्रेक्ष अद्वैत मताचे होते. ते इष्ट सिद्धि नामक ग्रंथाचा पाठ देत असताना पूर्ण प्रज्ञांनी त्यातील अनेक दोष दाखविले. त्याबद्दल त्यांचे काय मत आहे असे विचारले. अच्युत प्रेक्षांना पूर्ण प्रज्ञांचे नीट समाधान करता आले नाही. तेव्हा पासून अद्वैत मतावर भाष्य करण्याचे अच्युत प्रेक्षांनी सोडून दिले. आता मध्वाचार्यांची (पूर्ण प्रज्ञांची) प्रवचने सुरू झाली. मायावातावरणातील फोलपणा त्यांनी उघडकीला आणला. त्यांची वाणी ओघवती होती. गंगेच्या प्रवाहाप्रमाणे धो धो वाहत आहे, असे श्रोत्यांना वाटे. वाणीत माधुर्य, बुद्धीत संशय दूर करण्याची तत्परता इत्यादी गुणांमुळे त्यांचे प्रवचन ऐकण्यासाठी श्रोत्यांची गर्दी वाटू लागली.

### दिग्विजय

मध्वाचार्य आपल्या विद्वत्तेने व अमोघ वक्तृत्वाने उत्तरोत्तर लोकप्रिय होऊ लागले. अच्युतप्रेक्ष-तीर्थ वृद्ध झाल्याने मठाचा कारभार निश्चित करण्यात आला. एका सुमुहूर्तावर मध्वाचार्यांना शंखाभिषेक करून मठाधिपति बनविले. त्यांचे नांव आनंदतीर्थ असे ठेविले. मोक्षेच्छु जीवांना आनंदाने शास्त्र प्रवृत्त करणारे म्हणून असे नांव ठेविण्यात आले. आनंदतीर्थांबरोबर अनेक पंडित वादविवादासाठी येत. उडुपी येथे रोजच वादविवाद होऊ

लागले. जगत् मिथ्या यातील फोलपणा ते पटवून देत. एकदा वादिसिंह व बुध्दिसागर असे दोन पंडित आनंद तीर्थांना शोधत उडुपीला आले. त्यावेळी आनंदतीर्थ उडुपीत नव्हते. अच्युत प्रेक्षानी त्याना या कामासाठी बोलावून घेतले. आनंदतीर्थ आल्यानंतर दोघात वादविवाद झाला. वादात वादिसिंहाचा पराजय झाला. बुद्धिसागराने आपण वाद उद्या करू असे सांगून तेथून काढता पाय घेतला. रात्रीच उभय पंडितांनी उडुपीतून पलायन केले. अच्युत प्रेक्षानी एकदा आनंद तीर्थांना सांगितले - तत्त्वज्ञानाची मांडणी करताना आपले अपेक्षित मत नुसते सांगून भागत नाही, त्याचबरोबर विरुद्ध मताचाही साधक बाधक रीतीने विचार करून प्रतिवादी मताचे खंडणही करावे लागते.

## दक्षिणेत संचार

वेदव्यास प्रणति मतांचा विचार आसेतु हिमाचल होणे जरूर आहे. या साठी संचारार्थ आनंदतीर्थांनी अच्युत प्रेक्षांची अनुज्ञा मागितली. पहिल्यांदा त्यांनी परवानगी नाकारली. काही वर्षांनी पुन:परवानगी मागितली त्या वेळी त्यांनी परवानगी दिली. आणि स्वत: देखील त्यांच्याबरोबर गेले. ते उभयता उडपीहून निघून कासारगोड पासून तीन मैलावर असलेल्या विष्णु मंगल गांवी आले. या ठिकाणी विष्णु देवतेचे एक सुंदर मंदिर आहे. आचार्यांची कीर्ती पसरल्यामुळे अगोदर पासूनच त्यांच्याबद्दल समाजात आदर निर्माण झालेला होता. लोकांनी त्यांचा मोठ्या प्रमाणावर सत्कार केला. तेथून ते अनंत शयन येथे आले. त्याचवेळी रामेश्वराच्या यात्रेला निघालेले शृंगेरीपीठाचे शंकराचार्य विद्याशंकर भारती तेथे आले होते. दोघांचा वाद झाला. शंकराचार्यांचा पराभव झाला. आनंदतीर्थ तेथून निघाले. पद्मनाभाचे दर्शन घेऊन अनेक स्थळे पहात कन्याकुमारीस आले. इथे काही दिवस मुक्काम करून रामेश्वरला गेले. तेथे रुद्रांतर्गत रामचंद्राचे दर्शन घेतले. चार महिने इथे मुक्काम केला. चातुर्मास आटोपून पांड्य, चोल देशातून परत निघाले. मग श्रीरंगक्षेत्री आले. प्राचीन काळापासून श्रीरंगक्षेत्र हे वैष्णव क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. तेथे विद्वानांची परंपरा आजतागायत चालू आहे. तेथून ते श्रीमुष्ण क्षेत्री आले. मार्गात ठिकठिकाणी अनेक विद्वत् सभा झाल्या. आचार्य विजयी होऊनच पुढे जात. अशा प्रकारे दक्षिणेत मायावादाचे खंडन करीत मध्वाचार्य हिंडले. एकदा विश्व शब्दावरून वाद झाला. त्याचे त्यांनी शंभर वेगवेगळे अर्थ सांगितले. अपाला शब्दावरूनही वादंग झाला आचार्य म्हणाले अपाला याचा अर्थ नव यौवना असा आहे.

## बदरिकाश्रम यात्रा

दक्षिण भारताची यात्रा आटोपून आचार्य उडुपीला आले. या प्रवासात घडलेले विशेष कार्य म्हणजे विद्याशंकर यतींबरोबर झालेला वाद. याच प्रवासात गीतेवर एक भाष्य लिहिले आणि ते अच्युत प्रेक्षाना समर्पित केले. अच्युत प्रेक्षाकडून बदरीला जाण्याची अनुज्ञा घेतली. या यात्रेत आचार्यांनी उपनिषद्, भारत, भागवत, अठरा पुराणे, पांचरात्र या ग्रंथांचे शोधन केले. आचार्य बदरिकाश्रमी आले. नरनारायण देवालयापर्यंत जाणे त्या वेळी शक्य होते. पुढे गहन अरण्यात वेदव्यासांचा आश्रम होता. नारायणाचे दर्शन घेऊन गतिभाष्याची एक प्रत नारायणाला समर्पित केली. गंगा नदीत थंड पाण्यात स्नान करीत, आन्हिके आटोपीत नारायणाचे ध्यान करत आणि स्वलिखित गीताभाष्य नारायणाला वाचून दाखवीत. असा त्यांचा दिनक्रम चाले. तिथे ४८ दिवसाचे व्रत केले. नारायणाकडून व्यास आश्रमाकडे जाण्याची अनुज्ञा मिळाली. सत्यतीर्थ त्यांच्या पाठोपाठ निघाले. पण ते दमले. आचार्यांनी त्याना पुढे न येण्याबद्दल सांगून एकटेच गेले. व्यासांची भेट घेतली. व्यासांनी आचार्यांना ब्रह्मसूत्रावर भाष्य लिहून स्वमत प्रकट करण्याची आणि ते प्रसारित करण्याची अनुज्ञा दिली. ती आचार्यांनी शिरसावंद्य मानली. भाष्य रचून झाल्यावर तडक उडुपीकडे येण्यास निघाले. भाष्य लिखाणाचे काम सत्यतीर्थ यांनी केले. 'सत्य तीर्थेन भाष्यं आलिखितम्'। या भाष्यात आधीच्या भाष्यकारांचा समाचार घेतला आहे.

मध्वाचार्यांच्या पूर्वी सुमारे एकवीस भाष्ये झालेली होती. ते उडुपीला परतत असताना बंगाल मार्गे आले असावेत. श्रीकृष्ण चैतन्यांनी स्थापन केलेल्या संप्रदायास मध्वाचार्यांची शाखा असावी असे म्हणतात. या यात्रेत दोन शिष्यांची भर पडली. शोभन भट व शाम शास्त्री, शामशास्त्री हेच नरहरीतीर्थ म्हणून प्रसिद्धि पावले. ते संन्यस्तवृत्तीने राहिले. काही काळ ओरिसाचे राज्य यानी सांभाळले. कदाचित संन्यस्त राहून राज्य कारभार पहाणारे हे पहिलेच संन्यासी असावेत. शोभनभट पद्मनाभतीर्थ म्हणून प्रसिद्ध झाले. मध्व लिखित ग्रंथावर यांच्या उत्तम टीका आहेत. आचार्य सुखरूप उडुपीला परतले. अच्युत प्रेक्षाना आनंद झाला. ब्रह्म सूत्रावरील त्यांचे भाष्य वाचून अच्युत प्रेक्षाना परमानंद झाला व त्यानी द्वैतमताचा स्वीकार केला.

## श्री कृष्ण प्रतिमेची प्राप्ती

उडुपी पासून समुद्र तीन चार मैल लांब आहे. एकदा कृष्णाचे ध्यान करत ते त्या बाजूने निघाले. त्यांच्या मुखातून स्तोत्र अभिव्यक्त झाले. ते द्वादश स्तोत्र या नावाने प्रसिद्ध आहे. समुद्र स्नान आटोपून ते वाळवंटातच ध्यानस्थ बसले. त्यांच्या नेत्रातून दिव्य असे काही तरी प्रकाशले. त्यांची दृष्टी समुद्राकडे गेली. द्वारकेहून येत असलेली नाव वाळूत रूतून बसली होती. आचार्यांनी छाटी फडकाविली. वाऱ्याच्या झोताने ती नाव किनाऱ्यावर येऊन पोचली. नावाड्याला आनंद झाला. आचार्यांना द्रव्य देऊ लागला. त्यांनी द्रव्य घेण्याचे नाकारले. नावाडी फारच आग्रह करू लागला. यासाठी त्याजकडून गोपी चंदनाचे चार खडे घेतले. त्यापैकी एक गोपीचंदनाचा खडा शिष्यांना उचलेना. तो आचार्यांनी स्वत: आपल्या खांद्यावर घेतला. आणि शिष्यासह ते परतले. परतत असतानाच ६ ते १२ श्लोक स्तोत्राचे पूर्ण केले. शिष्याकडे तीन खडे होते. त्यापैकी एक खडा रस्त्यात फुटला. त्यात बलरामाची मूर्ती निघाली, दुसरा फुटला त्यात सुदर्शनचक्र, रवी व दोरी निघाली. तिसऱ्यात बालकृष्णाची प्रतिमा निघाली. ती प्रतिमा पाहून आचार्यांना आनंद झाला. त्या प्रतिमेची उडुपीत स्थापना केली, त्यावर भव्य देवालय न बांधता साधेच पण चांगले देवालय बांधले. श्रीकृष्णाच्या पूजेची उत्तम व्यवस्था केली. उडुपीत असताना आचार्य स्वत: पूजा करीत. आपल्या पश्चात निवडक आठ जणांना या कामासाठी नेमले. प्रत्येक शिष्याने दोन महिने पूजा करावी असे ठरविले. पुढील काळात वादिराजाने ही मुदत वाढवून दोन वर्षांची केली.

## दुसऱ्यांदा बदरी यात्रा

आचार्य दुसऱ्यांदा बदरिकाश्रमाची यात्रा करण्यासाठी गेले. वेदव्यासांची भेट घेतली. महाभारत तात्पर्य लिहिण्याची आज्ञा झाली. तात्पर्य ग्रंथ लिहून त्याचा प्रसार व प्रचार केला. द्वैत तत्वोपदेश करत भरत खंडात आचार्य तीन वेळा हिंडले. ते एकदा गोव्याला गेले होते. त्या बाजूला गोकर्णमठ बांधला. या मठातून अहर्निश प्रवचन, ग्रंथ प्रकाशन चालू असते. मठाधिपतींचा मुक्काम पर्तगाळी येथे असतो. संगीताने फुलझाडाना बहर येतो हे सप्रमाण तिथे सिद्ध करून दाखविले.

## शिष्य समुदाय

आचार्यांकडे अनेक विद्वान मंडळी अध्ययनासाठी येत. त्यापैकी पद्मनाभतीर्थ, नरहरीतीर्थ, माधवतीर्थ, अक्षोभ्यतीर्थ, त्रिविक्रम पंडिताचार्य, सत्यतीर्थ (संन्यासी) प्रमुख होते. या सर्वांनी द्वैत सिद्धांताच्या प्रसाराचे कार्य केले. आचार्यांच्या आज्ञेवरून ओरिसा प्रांतातील राज्याचे काम नरहरी तीर्थांनी पाहिले. संन्याशाने राज्य केलेले कदाचित हे पहिलेच उदाहरण असावे. इ.स. १२७९ ला गंग घराण्यातील गणपति भानुदेव निधन पावला. त्याचा मुलगा नरसिंह (दुसरा) अल्पवयी होता. नरहरींनी बारा वर्षे राज्यकारभार पाहिला (शिलालेख २१ मार्च १२८१) तसेच शेवटचा शिलालेख इ.स. १२९४ चा आहे. उपनयन होताच संन्यास घेण्याची प्रथा आजही या मठात आहे. पद्मनाभ, नरहरी, अक्षोभ्य, माधव हे चार प्रमुख शिष्य होते.

नरहरी तीर्थानी भाष्यावर व प्रकरण ग्रंथावर टीका लिहिल्या आहेत. आचार्यानंतर सात वर्षानी ते पीठावर बसले. पुढे नऊ वर्षे ते पीठावर होते.

### शेवट

आचार्यांचे योगसामर्थ्यही अद्भूत होते. तीस माणसांना उचलता येणार नाही असा ध्वज ते एकटे उचलून हिंडत. हे त्यांना योग सामर्थ्याने जमत असे, आचार्यांचे जीवन चरित्र अद्भुत आहे. आचार्य इहलोक सोडण्यापूर्वी काही दिवस कृष्ण तीर्थाजवळ राहात होते. सूर्य ग्रहणाचे वेळी एकदा समुद्रतीरी ऐतरेय उपनिषदावर प्रवचन केले. व त्यानंतर आपले सर्व आयुष्य द्वैत सिद्धांत प्रस्थापित करण्यात घालविले. ते एकूण ९५ वर्षे या भूतलावर होते. पैकी ८० वर्षे संन्यस्त वृत्तीने राहून तत्वोपदेश केला. ते वासुदेवाचे अवतार होते असे मानले जाते. नरहरी तीर्थाकडून श्री मूळ राम सीता देवतांच्या प्रतिमा मिळाल्यानंतर त्यांचे पूजन ८० दिवस केले व नंतर त्या प्रतिमा सांभाळण्याचे काम पद्मनाभ तीर्थाकडे सोपविले. माघ शुद्ध नवमी रोजी अदृश्य होऊन व बदरिकाश्रमी व्यासदेवांच्या सान्निध्यात वास्तव्य केले. ते तेथेच आहेत असे मानले जाते.

### माध्व मठ

सध्या एकूण अठरा मठ आहेत. १) उत्तरादि २) व्यासराय ३) कुंदापूर ४) रायवेन्द्र (५ ते १२) उडुपीत मठ (एकूण ८) १३) सुब्रह्मण्यम् १४) भंडारगिरी १५) भीमन कट्टी १६) मजगीहल्ली १७) श्रीपादराय १८) कुडळगी. या खेरीज वैष्णव सारस्वतांचे दोन मठ आहेत. १) गोकर्ण मठ २) काशी मठ. गोकर्ण मठाचे मुख्य स्थान पर्तगाली. काशी मठाचे मंगलोर जिल्ह्यातील मुळची होय. मुंबईत बाणगंगा इथे या मठाची सुंदर इमारत आहे. बंगाल मधील वैष्णव संप्रदाय - याजवर मध्व तत्त्वज्ञानाची छाप पडली आहे. चैतन्य संप्रदाय हा मध्व संप्रदायच. या बद्दल स्वामी विवेकानंदांनी आपले मत प्रकट केले आहे. राजेंद्रस्वामी हे मध्वापासून आठवे. ते बंगालमध्ये गेले. यांचे नंतर पाचवे स्वामी श्री व्यासतीर्थ हे बंगालमधे गेले. यांचे पासूनच चैतन्य संप्रदायाच्या मूळ स्वामींनी संन्यास घेतला यांची नावे लक्ष्मीकांत तीर्थ, त्यानी माधवेंद्र पुरी यांना संन्यास दिला. यांचे नंतर नित्यानंद तीर्थ त्यांचे शिष्य अद्वैतानंद यांचे पश्चात ईश्वर पुरी यांचे पासूनच महाप्रभू श्रीकृष्ण चैतन्य यांनी दीक्षा घेतली.

### द्वैत तत्त्वज्ञानाचे प्रवचन

जीव व ब्रह्म यांचे ऐक्य होणे कसे शक्य आहे? अंधार प्रकाश, सुख आणि दुःख ज्ञान व अज्ञान यांचे ऐक्य होणे कधी शक्य आहे काय? परमात्मा व जीव यांच्या मध्ये फारच मोठे अंतर आहे, हे अंतर तोडून जीव परब्रह्म होणे कधी तरी शक्यच आहे काय? जगत् हे आपणास दिसते, सुख दुःख वगैरे हरघडी आपण भोगतो तर हे जगत् मिथ्या कसे? अशा तऱ्हेने प्रत्येकाला ते उपदेश करीत. आचार्यांची प्रवचनाची जागा अनंतेश्वराच्या देवालयात होती. ती जागा अद्याप तशीच आहे. तिथे त्यांच्या मूर्तिची स्थापना करण्यास वादिराज स्वामीनी प्रयत्न केला. आचार्य स्वप्नात येऊन तसे करण्याबद्दल त्यांना मनाई केली. त्यानी तो विचार तसाच सोडून दिला. आज त्या जागेभोवती कुंपण घातले आहे, कोणी पृच्छा केल्यासच ही जागा दाखविण्यात येते.

- शं.बा. मठ
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

# भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना

*वैदिक रचना, विश्वसंकल्पना यांच्या दृष्टीने भारतीय संस्कृतीचा विचार मांडणारा हा लेख, विषयाची संगती लागण्याच्या दृष्टीने वाचकांनी हे सर्व लेख एकत्रित ठेवावेत ही विनंती - संपादक*

## बीज संकल्पना

भारतीय संस्कृतीत म्हणजेच वैदिक संस्कृतीत किंवा आर्य संस्कृतीत **'यज्ञ'** व **'अग्नि'** ह्या दोन संकल्पनांचा विचार आपण विद्या प्रसारक मंडळाच्या 'दिशा' मासिकाच्या मे, जून व ऑगस्ट २००६ या मासिकांत 'बीज' स्वरूपांत पाहिला.

## गुरूकिल्ली

'यज्ञ' व 'अग्नि' ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद या संहितामध्ये वेगवेगळ्या उद्दिष्टांसाठी ह्या संकल्पनांचा उल्लेख वारंवार आढळतो. संस्कृतीच्या बीज स्वरूपाशी, संस्कार क्रियेशी व एकंदरच ह्या विश्वातील व विशेषत: पृथ्वीवरील जीवसृष्टीच्या युगायुगांतील विकासाची **गुरूकिल्ली** ह्या दोन संकल्पनांत आहे हे तितकेसे स्पष्टपणे आपल्या जाणीवेत नाही. ही खरोखर खेदाची गोष्ट आहे!!

## वेदरहस्य

**महायोगी अरविंदांच्या दृष्टिकोनातून** ह्या संकल्पनांचे महत्त्व न जाणण्याचे कारण **'वैदिक श्रुती ज्ञानाचा'** खरा बोध व त्याअनुसार कृती न होण्यामागे आहे. त्यांच्या 'वेदरहस्य' 'Secrets of Vedas' ह्या अतिशय महत्त्वाच्या ग्रंथात त्यांनी ह्या विषयावर अत्यंत मूलगामी व विस्तृत भाष्य केले आहे, ते वाचले जात नाही वा त्यावर चर्चाही होत नाही, ही एक अत्यंत उदासीन वा बेपर्वा प्रवृत्ती म्हणता येईल. ह्याचे एक मुख्य कारण म्हणजे **'भारतीय संस्कृतीची'** जी **'भेळपुरी अवस्था'** जनमानसात सध्याच्या राज्यकर्त्यांनी व शिक्षणपद्धती व संस्थानी रुढ करून ठेवली आहे, ती एक महत्त्वाचे कारण आहे. त्यामुळे ह्या 'भेळपुरी भारतीय संस्कृती' म्हणजे 'National Culture of India' - (Abid Hussein) संकल्पित ह्या रूपामध्ये आणि ग्लोबलायझेशन मधील येणाऱ्या दुसऱ्या भौतिक, रिडक्शनिस्ट, पशुवृत्ती व व्यापारी वैश्यवृत्ती, युद्धपिपासू वा तामसी संस्कृतीच्या येणाऱ्या लाटेसमोर, स्वत:चे कसे कांहीच वैशिष्ट्य न दिसल्यामुळे, (वा न जाणल्याने) इथल्या विचारवंतानी अगोदरच सपशेल लोटांगण घातले आहे, ते कारण आहे, आणि, सध्याच्या राज्यकर्त्यांनी तर कोठलीही उच्च सांस्कृतिक ध्येये नसल्याने किंवा हवीशी नसल्याने त्यांना खऱ्या **'वैदिक संस्कृतीचा वारसा'** सुद्धा नकोसा झाला आहे.

पुष्कळ खंत वाटणाऱ्या गोष्टी आहेत. पण, ह्याही पार्श्वभूमीवर आपण केवळ ह्या दोन कल्पनांचा अभ्यास केलात, तर 'ह्या भारतीय वैदिक संस्कृतीची थोरवी, उच्च आदर्श, युगायुगातून व जन्मजन्मांतरातून होणाऱ्या ह्या संस्कृतीच्या वृद्धीची धारणा, आखणी व 'मानवी जीवनाच्या' वैधिक वाटचालीची साधने, सामुग्री, ज्ञान व सांस्कृतिक ध्येयांची, उंची जाणवेल.

## भौतिकवादी विज्ञान

दिशाच्या ऑगस्ट २००६ च्या अंकात मी असा उल्लेख केला होता कीं ''या लोकविलक्षण अशा वैदिक हिंदू संस्कृतीतील आणि भारतीय उपक्रमाच्या ह्या अफाट

प्रयत्नाच्या व प्रकाशाच्या जवळ जाण्यात पाश्चात्य भौतिकवादी वैज्ञानिक काय प्रगती करतात?''

ह्या प्रश्नाच्या शोधाच्या मागे एक विशिष्ट धारणा आहे. जरी भारतात जन्माला येणे, ही या संस्कृतीचा नैसर्गिक वारसा प्राप्त होणारी युगवैशिष्ट्यपूर्ण लाभ वा संधी, ह्या पवित्र व आध्यात्मिक बीजाच्या भूमीवरील नागरिकाला नैसर्गिकपणे प्राप्त झाली, तरी त्याच्यावर २०० वर्षांपूर्वीपासून लादलेल्या भौतिकवादी शिक्षणपद्धती (Lord Macauley) व भौतिकवादी जीवनपद्धतीचा संस्कारांचा परकीय सांस्कृतिक विचारांचा प्रभाव जबरदस्त आहे. मानव म्हणून त्याच्या नैसर्गिक प्रगतीच्या वा जीवनाच्या खरोखर दोन 'दिशा' आहेत. एक **'अभ्युदय'** - म्हणजे 'भौतिक वृद्धी, भोग व सुखे आणि दुसरी 'नि:श्रेयस' सुख, जे आध्यात्मिक प्रगतीवर आधारलेले आहे. ह्या 'दुसऱ्या दिशेत' त्याचा **'जन्मजन्मांतरीच्या प्रवासाचा'** व उद्धाराचा संस्कारमार्ग आहे. ह्या दुसऱ्या मार्गावरील त्यांचा विश्वास, श्रद्धा व शहाणपणाची खात्री ही पूर्णपणे ढासळून गेली आहे. त्यामुळे हा 'सुदैवी भारतीय मानव' हा दैवी व्यक्तित्वाच्या प्रगतीच्या मार्गापासून च्युत होऊन, केवळ 'मर्त्य' व 'प्राणी जीवन' जगण्यात व भोगण्यात धन्यता व अंतिम सुख मानू लागला आहे. ज्या वैदिक संस्कृतीने त्याला पशुवृत्तीतून दैवी संपदेपलिकडे नेण्याचा चंग बांधला आहे व तशा संस्कारांची साधने प्रदान केली आहेत, त्यांतून त्याने पळ काढला आहे. **तो एक 'ड्रॉप आऊट' विद्यार्थी बनला आहे.**

### ज्ञान व संस्कृती भाषा

त्याची एक दुसरी मोठी अडचण आहे. त्याला ही 'वैदिक भाषा' उमजत नाही. त्याची भाषा ही भौतिकवादी विश्वासाची झाली आहे. भाषेच्या कल्पनासंग्रह व शब्दसंपत्ती मागे ज्या आध्यात्मिक, योगिक आगमशास्त्राच्या व मंत्रशास्त्राच्या संकल्पना आहेत, त्या शब्दांचे व संकल्पनांचे आता शुष्क, निष्प्राण, प्रेतवत व मृत सांगाडे राहिले आहेत.

तो जेव्हा एखाद्या जीवात्म्याला ही पृथ्वीवर सोडून जाणाऱ्या मृत देहाला यांत्रिकपणे संबोधून म्हणतो की 'त्याच्या आत्म्याला सद्‌गती मिळो - किंवा - मृतात्म्याला शांति मिळो - किंवा त्याचे प्राण पंचतत्वात विलीन होवोत'- वगैरे वगैरे, तेव्हा ह्या अंत्येष्टि ह्या वैदिक संकल्पनावर त्याचा पूर्ण विश्वास नसतो, पण एक सामाजिक उपचार व शिष्टाचार म्हणून तो ही बोध न झालेली निष्प्राण वाक्ये म्हणतो. काय ही दयनीय अवस्था झाली आहे, आपल्या संस्कारांची व संस्कृतीची!!

तेव्हा, अशा मानवाला पाश्चात्य संस्कृतीतील केवळ व्यवहारी 'देह दहनाची' इलेक्ट्रिक भट्टी किंवा डिझेलची अग्निची व्यवस्था ही Hygenic सामाजिक आरोग्यदायक, Practical व्यवहार्य (व मृत शरीराचा 'डिके' (Decay) होऊ नये ही कृती म्हणून **"Body disposal"** ची समाजसंमत व्यवस्था ) मनोमन पटते. त्याला स्वत:च्या संस्कृतीची आध्यात्मिक भूमिका ज्ञात नसते.

मग, त्याला 'श्राद्ध' संस्थेवरचा अर्धवट विश्वास बोचू लागतो व त्याला एक 'विज्ञानवादी सद्यमनस्थितीत मन:शांति देणारा एक व्यवहार्य 'Shortened Course' स्वागतार्ह वाटतो-नाही का? ही जी द्विधा व दोलायमान वृत्ती झाली आहे, त्याचे कारण 'विश्वासाच्या' पाठीमागे जी अंत:करण, मन, बुद्धीची 'सत्य भूमिका' लागते, ती लोप पावली आहे, निसरडी झाली आहे.

अशा मानवाला-मग तो नशीबाने व पूर्वपुण्याईने भारतात व हिंदू म्हणून जरी जन्माला आला असला, तरी त्याला त्याच्या भौतिकवादी विश्वासातून भौतिक भाषाच फक्त समजते व त्याला वैदिक संस्काराच्या अनुभूतीकडे नेऊ शकते. वैदिक ऋषींचे मार्ग व साधना त्याला अनभिज्ञ आहेत!!

त्यामुळे त्याच्या ह्या ''भौतिकवादी विज्ञानात'' कोणत्या 'प्रगत (?)' संकल्पना आल्या आहेत त्या भंरवशावर त्याने वैचारिक प्रगती करणे, जास्त सुगम व सहजशक्य वाटणे स्वाभाविक आहे, याची मला कल्पना आहे, वा आता तर खात्रीच पटली आहे!!

## गोरक्षनाथ

तेव्हा ह्या मानवाच्या भौतिकवादी विश्वासातून आपण अशा काही अनुकूल संकल्पना तपासून पुन्हा नंतर 'यज्ञ' व 'अग्नि' ह्या वैदिक मूळ, शुद्ध संकल्पनांकडे वळू या. 'पिंडी ते ब्रह्मांडी' हा एक मोठा वैदिक ज्ञानाचा सिद्धान्त आहे. तो गोरक्षनाथांनी अनुभवला व त्यांच्या तत्वज्ञानाचा तो एक आधारस्तंभ आहे.

''पिण्डमध्ये चराचरी यो जानाती।
स योगी पिण्ड संनितिर्भवति ॥
ब्रह्माण्डवर्तियत किंचित तत् पिण्डे ऽप्यसि सर्वदा॥''
(सिद्धसिद्धान्त पद्धती ३-१-२)

आपल्या "Philosophy of Gorakshnath" ह्या ग्रंथात श्री. अक्षयकुमार बानर्जी म्हणतात.

"Hence man as an individual has on account of his fine bodily constitution an exceptional opportunity for dwelling in all the various orders of worlds and participating in the various orders of existences and experiences. An, individual man with his individual phenomenal consciousness can, through appropriate methods of self-discipline and self refinement, acquire the power to pass easily from one world of existence and experience to another.

Thus the individual Human Body occupsies a very important position in the evolutionary process of the cosmic system in the process of the phenomenal self-manifestation of 'Siva-Sakti' in the spatio-temporal cosmic order.

Gorakshnath accordingly dilates in a rather elaborate manner upon the psycho-physiological constitution of the 'Human Body', which is evolved from the 'Prakriti-Pinda' of 'Brahma', who is conceived as the immediate 'Divine Source' of the world of Individual existece in the physical plane."

(मोतीलाल बनारसीदास, Reprint edition 1988 पान १३७) (1SBN 81-208-0535-6 (Paper)

## होलोग्राम

आता पाश्चात्य पदार्थविज्ञान शास्त्रात काय चालले आहे ते बघूया!! १९८२ मध्ये पदार्थविज्ञानातील एक संशोधक **अलेन आस्पेक्ट** यांनी असा शोध लावला कीं अती सूक्ष्म इलेक्ट्रॉन आपआपसांत तत्काल, एका क्षणात संसर्ग व संवाद संबंध करू शकतात, मग त्यांच्यामधील अंतर १० फूट किंवा १० बिलीयन मैल असले तरीही!


ह्या क्रांतिकारी संशोधनामुळे **आल्बर्ट आईनस्टाईन** यांनी सांगितलेल्या **तत्वाला खोटे ठरविले.** त्यांच्या म्हणण्याप्रमाणे **असे होते की, कुठलीही चीज प्रकाशाच्या वेगापेक्षां जास्त वेगाने जाऊं शकत नाही कारण नाहीतर 'काळ' ह्या बंदिस्त संकल्पनेचाच भेद होईल.**

त्यावर **डेव्हिड बोहम्** ह्या युनिव्हर्सिटी ऑफ लंडनच्या शास्त्रज्ञाचे विचार महत्वाचे ठरावे.


"**Objective reality** does not exist, that despite its apparent solidity the universe is at heart a **phantasm - a gigantic and splendidly detailed Hologram.**"

काय आहे हा **''होलोग्राम''**?

होलोग्राम हा एक तऱ्हेचे विशेष कॅमेरासारखे तंत्र किंवा यंत्र आहे. सर्वसाधारण फोटो हा दोन 'डायमेन्शनमध्ये' समोरील वास्तवाचे (जे खरोखर निर्मिती असते) चित्र पकडतो.




चित्र नं. १ : Hologram Technique Laser Beam




चित्र नं. २ : Hologram Concept with Laser Beam for a Total Reality View

पण, होलोग्राम मध्ये मात्र तीन डायमेंशनचे चित्र घेता येते. ही पद्धती कशी आहे त्याचे एक चित्र छापले आहे. ह्यात 'लेझर' नांवाचा प्रकाश किरण वापरला जातो. "There are two physical phenomena as the principles of Holography-'Interference' and 'defraction' of light waves. Holograms are photographs of three dimensional impressions on the surface of light waves.

आपल्याला ह्या विशिष्ट तंत्रयंत्रपद्धतीत आतां शिरावयाचे नाही. पण, ह्या 'होलोग्राम तंत्राच्या' शोधामुळे जड विज्ञानाच्या-पाश्चात्य वैज्ञानिक विचार व तत्त्वज्ञानात काय फरक पडला ते पहावयाचा आहे. आणि हे ज्ञान वैदिक ऋषी यांनी वैदिक ज्ञानात केव्हांच सांगितले आहे याची खात्री पडेल. आपला हेतू हा आहे कीं वैदिक ऋषींनी किंवा वैदिक संहितांमधून ज्या संकल्पना कथित केल्या आहेत. त्यांचा स्वीकार हा अजूनही मानवी कॉशसनेसच्या भाग झालेला नाही, आणि हिंदू धर्माला वरवर मानणाऱ्या सध्याच्या भारतीय माणसाला सुद्धा ह्या संकल्पना जवळच्या किंवा अनुभूतीच्या क्षेत्रात वा प्रांतात याव्यात असे मनोमन वाटत नाही. असा प्रयत्न पण नाही! अशी इच्छा सुद्धा नाही! अशी साधना करण्याची प्रवृत्ती किंवा निश्चय तर बिलकूल नाही.

**पाश्चात्य गुलामगिरीत हिंदू समाजाचा विचार प्रवाह**

तेव्हा **पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या या गुलामगिरीत जखडलेल्या 'हिंदू कॉशसनेसला' निदान पाश्चात्यांच्या अनुकरणाने या सिध्दी प्राप्त झाल्या तरी 'देव पावला'!**

काय आहेत अश्या नवीन 'होलोग्राम'च्या संकल्पना? "Every part of a hologram contains all the information possessed by the whole." "Whole in every part."

जर 'मानवी पिंड' हा वैश्विक शिव-शक्ती **'महासाकार पिंडाचाच'** व तत्त्वांचाच, एक छोटी प्रतिकृती असेल, तर त्याला 'ब्रह्मज्ञांन' म्हणजे विश्वाच्या रचनेचे व संकल्पनेचे गूढ त्याच्या देहांतच, पिंडातूनच प्राप्त व्हावयाला हरकत नसावी. आपल्या देशांतील नाथ पंथीय किंवा इतर तांत्रिक सांप्रदायिक मंडळींच्या याच तत्त्वावर आधारलेल्या साधना व सिद्धी आहेत.

पण, पाश्चात्य 'रिडक्शनिस्ट' पद्धतीला ह्यामुळे मोठा फटका बसला आहे. काय होती ही पद्धत ?

"Western science has labored under the bias that the best way to understand a physical phenomenon, whether a frog or an atom, is to dissect it and study its respective parts.!!

'होलोग्राम' आपल्याला हे दाखवतो की जगातील महत्वाची गूढ तत्त्वे ही या पाश्चात्य पद्धतीने उलगडणार नाहीत. त्याला ब्रह्माच्या संकल्पनेच्या जाणीवेतून जडाच्या अस्तित्वाचा अर्थ व शोध घ्यावा लागेल, तरच आणि तेव्हाच 'जडाच्या अस्तित्वाची खरी सत्यता 'Objective Reality' 'Ontological understanding' मिळू शकेल.

**Vedic Wholistic Approach**

भारतीय वैदिक तत्वज्ञानात जेवढी म्हणून शास्त्रे वा कला आहेत, त्या प्रत्येकाच्या संहितांची सुरुवात 'ब्रह्म' ह्या मूळ संकल्पनेच्या स्पष्टीकरण व आधारावर झालेल्या आहेत. आपणास आयुर्वेद, योगशास्त्र, भारतीय नृत्य कला भरतमुनीने रचलेले भरतनाट्य, संगीत रत्नाकर वगैरे या सर्वांची सुरुवात 'ब्रह्म' ह्या वैश्विक दर्शनाच्या वर्णनापासून होऊन, नंतर त्या त्या वैशिष्ट्यपूर्ण व विशेष अशा ज्ञानशाखेत पदार्पण होताना दिसेल. ह्याचे उघड कारण म्हणजे ह्या सर्व कला व शास्त्रे ही त्या ब्रह्म संकल्पनेचाच अविष्कार आणि व्यक्त स्वरूप म्हणजे Manifestations आहेत.

**Holographic Paradigm**

प्रश्न हा पडेल की समोर दिसणाऱ्या व जाणवणाऱ्या मर्त्य जगालाच 'सत्य' संबोधून संपूर्ण सत्यज्ञानाला व अविचल ऋत ज्ञानाला प्रारंभ करतांना, जे पाश्चात्य तत्त्वज्ञान सुरुवात करते, त्याला ह्या 'इंद्रियगोचर' ज्ञानाच्या पलीकडे जे 'इंद्रियातीत, कालातीत, अवस्थात्रयातीत' अशा सत्य व ऋत ज्ञानाची जाणीव कशी होणार? पण, त्याला या **"होलोग्राफीक पॅरॅडिमने"** मोठा जबरदस्त धक्का दिला आहे.

पाश्चात्य वैज्ञानिक डेव्हिड बोहम तर ह्या होलोग्रामच्या 'दर्शनाने' इतका प्रभावित झाला की त्याने सांगितले कीं सूक्ष्म ॲटॉमिक कण हे अफाट अंतरावर असलेल्या आपल्या दुसऱ्या कणाशी असा तात्काल संबंध व नाते कसे साधू शकतात, - तर, त्यांची कांही अशी वेगवान वैचारिक, वैज्ञानिक शक्तिकिरणांची वगैरे वगैरे सोय नाही, तर, त्यांचे **'वेगळेपण हाच एक भ्रम आहे'**. ते एका विश्वबंधुत्वात अगोदरच बांधलेले आहेत.

"He argues that at some deeper level of reality such particles are not individual entities, but are actually extensions of the same fundamental something."

तो पुढे म्हणतो हे संबंध विश्वच एक 'होलोग्राम' आहे. 'Superhologram' आहे.

पण, ह्यामुळे पाश्चात्याच्या भौतिकवादी वैज्ञानिकांच्या 'विश्वरचना' व 'विश्वसंकल्पनेला' तडा गेला. मग काय झाले. त्यांच्याच शब्दात पाहू या.

This striking new picture of reality, the synthesis of Bohm and Pibram's views, has come to be called the **"Holographic Paradigm."**



चित्र नं. ३ : David Bohm

**Pribram's Maya**

प्रीब्राम हे शास्त्रज्ञ 'ब्रेन' (मेंदू) चा रिसर्च करीत होते. प्रीब्रामच्या शब्दात ही नवीन जाणीव पाहू या.

"If the concreteness of the world is but a Secondary reality and what is 'there' is actually a 'holographic blur' of frequencies, and if the brain is also a hologram and only selects some of the frequencies out of this blur and mathematically transforms them into sensory perceptions, what becomes of '**Objective reality? Put quite simply, it ceases to exist.** 'As the religion of the East have long upheld the material world is **'Maya'**, an illusion, and although we many think we are physical beings moving through a physical world, this too is an illusion."

पुढचे वाक्य अंतिम भविष्याचे दर्शन आहे. "we are really 'receivers" floating through a kaleidoscopic sea of frequency, and what we extract from this sea and transmogrify into physical reality is but one channel from many, extracted out of the "superhologram".

मला तर असे दिसते कीं एव्हढ्या स्पष्ट शब्दांत डेव्हिड, बोहम, प्रिब्राम व हायसेनबर्ग वगैरे सारखे पाश्चात्य वैज्ञानिक त्यांच्या वैज्ञानिक निष्कर्षांच्या व 'secular physical sciences' म्हणजे 'निधर्मी पदार्थ विज्ञानाच्या' सीमा दाखवीत असताना, भारतातले राज्यकर्ते, समाजशास्त्रज्ञ व सेक्यूलर विचारवंत तर स्वत: एका असत्य ठरलेल्या वैज्ञानिकांचा म्हणजे 'न्यूटन, डेकार्ट' वगैरेच्या मागासलेल्या व अपूर्ण विज्ञानाच्या 'सांगाड्यालाच व विश्वासालाच मिठी घालून बसलेले आहेत. आणि इथल्या युनिव्हर्सिटी, रिसर्च सेंटर्स व धार्मिक आणि कर्मकांडी वैदिक मंडळी सुद्धा खऱ्या वैदिक दृष्टीच्या दर्शनाला उत्सुक नाहीत!!

**सर्वसमभावी बुवाबाजी**

हीच गत 'भारतीय संस्कृतीची सर्वधर्मसमभाव ह्या बुवाबाजीच्या दार्शनिक मंडळींची झाली आहे. ते सुद्धा ह्या पवित्र भारतभूमीवर ज्या वैदिक संस्कृतीचा ओघ व स्रोत अनेक युगानुयुगे वर्धिष्णु होत आहे, त्या प्रवाहाकडे पाठ फिरवून उभे रहात आहेत. मानवी संस्कृतीच्या भविष्याचा हा खून आहे. भव्य व पवित्र परंपरेचा हा विश्वासघात आहे!!

सर्वसाधारण माणूस हा सर्व जीवनभर एखाद्या ठाशीव 'अपरिवर्तनीय' अश्या 'विश्वासाच्या तराफ्यावर' जीवन कंठीत असतो. हा 'तराफा' म्हणजे काही संपूर्ण सत्य आणि विश्वासाच्या आधारावर तरंगत नसतो आणि जर त्या नदीत किंवा समुद्रात वादळें निर्माण झाली - प्रलय अवस्था झाली, तर हा मानव त्याला तोंड देऊ शकत नाही. पण, गंमत अशी आहे कीं ही नदी व हा समुद्रच, एक 'स्वप्न' आहे असें जर त्याला जाणवले तर त्याची क्षणात सुटका होऊ शकते व ही नदी, समुद्र, तराफा नाहीसे होऊन, तो एका भक्कम भूपृष्ठावर उभा आहे, सुरक्षित आहे असे त्याला जाणवते ही सत्य भूमिका व सत्य क्षेत्र फक्त वैदिक ब्रह्मज्ञान देऊशकते.

पण, ह्यासाठी त्याला आपल्या विश्वासाची, चुकीच्या समजूतीची व भ्रमाची सोडचिठ्ठी द्यावी लागते. ह्या क्रांतिकारी बदलाला तो पात्र किंवा तयार नसतो. पण, युगायुगांत 'अवतारी' दैवी पुरुष हीच क्रिया व उपदेश करीत आले आहेत.

भगवान कृष्ण हेच गीतेत अर्जुनाला सांगतात

''यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत...
अभ्युत्थानधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम ॥७॥

परित्राणाय साधुनाम् विनाशाय च दुष्कृतम्
धर्मसंस्थापनाय संभवामी युगे युगे'' ॥८॥

(भगवद्गीता अध्याय ४)

**"The Process of Paradigm Shift"**

हेच सत्य पाश्चात्य वैज्ञानिक त्यांच्या भाषेत सांगताहेत. मिस्टर थॉमस कुन्ह म्हणतात :-

"In science, 'paradigm shifts happen, when there are anomalies, disparate, odd scientific results that cannot be explained away by inadequate method. When sufficient anamolies occur, those in any science must begin to consider that the paradigm, under which they are doing their work, is no longer of use or is actually dysfunctional. Today, we are faced with the same kind of situation in the world overall, where our paradigm is dysfunctional and a **large minority** is saying that we have to move to different fundamental assumptions."

पाश्चात्य वैज्ञानिक सांगताहेत कीं हे जुने पॅरडिम हे अकार्यक्षम झाले आहे, मोडकळीस आले आहे. एक मोठी **अल्पसंख्यांक ज्ञानी मंडळी** ही आपली जुनी गृहीते काळाच्या उदरात बुडवून द्यावयाला सांगत आहेत. आपल्या सध्याच्या विस्कळीत, परस्पर विरोधी व गोंधळाच्या परिस्थितीचे कारण जुने विज्ञान व निष्ठा सांगू शकत नाहीत - तेव्हा हे विश्वास व समजुती व ज्ञानपद्धती टाकून नवीन स्वीकारावयाला हव्यात.

पण, इथे काही विद्वान असे म्हणतील की वैदिक वैधिक दृष्टि व ज्ञान तर जुने आहे. ते कसे काय आपल्याला तारू शकेल ? तर त्याचे उत्तर हे आहे कीं ते 'अपौरूषेय श्रुती दर्शन' आहे. मानवी तोटक्या, संकुचित बुद्धीचे दर्शन नव्हे तर **'सनातन'** (चिरंतन) ऋत व सत्य दर्शन आहे. पण, ते एक मूलभूत पाया दर्शवणारे आहे आणि सदा बदलत्या जगात व बदलत्या काळात, बदलत्या युगधर्मात, बदलत्या मानव व इतर प्राणी व वनस्पतीच्या सृष्टीत व बदलत्या ग्रह, तारे व विश्व समूहात ह्या ब्रह्मज्ञानाच्या वैदिक दार्शनिक सत्य व तात्विक बैठकीवर तात्कालिक जाणत्या योगी ऋषीतुल्य विद्वानांनी नव्या युगधर्माच्या नविन संकल्पना - जीवनाच्या नविन विश्वासाच्या आधारशिला बांधाव्यात, कारण हे वैदिक तत्वज्ञान एक Dynamic चैतन्यशील विचार प्रवाह आहे. बदलत्या युगात व काळात, हे एखाद्या Lighthouse दीपस्तंभासारखे आहे, चिरंतन ज्ञान व नैतिकताचे दर्शन देणारे आहे. कारण ते 'ईश्वर निश्वसितच ज्ञान' आहे. 'श्रुती ज्ञान' आहे. हे तर ईश्वराने स्वत:च दिलेले 'मॅन्यूएल गाईड' आहे. सतत मानवी कॉशसनेसच्या अनंत काळाच्या प्रवासाचे आधारपुस्तक आहे. ते काळजीपूर्वक जतन करावयाला हवे. तसे ते गेले १०,००० वर्षे हिंदू व द्रविड समाजाने ही ह्या पृथ्वीतलावर संभाळले, सिंधू व सरस्वतीच्या काठांवर रहाणाऱ्या समाजाने गंगा, यमुना, गोदावरी, नर्मदा, कावेरी या जलाच्या आश्रयाने रहाणाऱ्या पिढींना पण उपयुक्त ठरणार आहे. त्या कर्तव्य बुद्धीने ते जतन केले पाहिजे, दान केले पाहिजे त्यांतच मानवी समाजाचे कल्याण आहे, वृद्धी आहे.

## भविष्यातील दिशा

या वैदिक ज्ञानाच्याच भूमिकेला पाश्चात्य तत्त्वज्ञान कसे हळू हळू निष्कर्षाला येते आहे, ते आपण आणखी काही उदाहरणांनी पाहू या. पण, त्याचबरोबर इथल्या समाजाची जी एक 'शीत पेटी' झाली आहे आणि त्यांचा स्वत:चाच स्वत:च्याच वैदिक संस्कृतीच्या वारसावरचा विश्वास दासळला आहे, त्यांना निदान भौतिक विज्ञानाच्या भूमिकेतून तरी या सत्याकडे येऊ या. आणि सरतेशेवटी एका सीमेवर आल्यावर या भौतिक ज्ञानाच्या 'स्पिरीच्यूअल ज्ञानाच्या संक्रमणासाठी ज्या साधना, मॉडेल व बीज संकल्पना भारतीय संस्कृतीत उपलब्ध आहेत त्यांचा मन:पूर्वक स्वीकार त्यांनी करावा, अशा आशा आपण व्यक्त करूया. भेटू या पुन्हा दिशाच्या पुढील अंकात.

**यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट, अग्यारी लेन,

ठाणे - ४००६०१.

टे. नं. २५३६८४५०

E-mail : yrsane@eth.net Mbl : 9892046539

# कथा विकास व १९४० पर्यंतची मराठी कथा धावता दृष्टिक्षेप (लेखांक २)

*कथेच्या व प्रामुख्याने मराठी कथेचा विचार करताना, याबाबत संशोधन करताना केलेले हे लेखन आहे. या संशोधनाचे मार्गदर्शक प्रसिद्ध समीक्षक कै. प्रा. ल. ग. जोग हे होते. - संपादक*

## अव्वल इंग्रजी कालखंड

शिवकाल संपून पेशवाईच्या कालखंडाचाही अंत १८१८ साली झाला. इंग्रजांची राजवट भारतात निश्चित झाली. या राजकीय स्थित्यंतराचे परिणाम भारतीय सांस्कृतिक जीवनातील प्रत्येक क्षेत्राप्रमाणेच साहित्यावरही झाले व साहित्य इतिहासास सर्वस्वी नवे वळण मिळाले. इंग्रजी राजवटीतील मराठी कथात्मक साहित्याकडे वळण्यापूर्वी आधीच्या कालखंडांबद्दल एक मुद्दा स्पष्ट करणे आवश्यक आहे. या आधीच्या उपर्निदिष्ट कालखंडात पद्यसाहित्य निर्मितीचे प्रमाण विपुल होते. या पद्य साहित्यात अगदी प्राचीन पद्यापासून ते पेशवेकालीन पोवाडे ते लावण्यांपर्यंतच्या बहुतेक पद्यातून कथात्मकता ही प्रामुख्याने होती. पंडित कवींच्या अनेक स्वयंवर काव्यातील कथनात्मकता, किंवा शाहिरी पोवाड्यांतील कथनात्मकता उदाहरणादाखल लक्षात घेता येईल. प्रस्तुत प्रकरणाच्या आरंभी स्पष्ट केल्यानुसार कथा सांगणे ही माणसाची मूलप्रवृत्ती होय। परंतु या सर्व कालखंडातून कथात्मतेचा आविष्कार पद्यातून झालेला दिसून येतो. प्रस्तुत लेखात कथेच्या पद्याविष्काराचा विचार करावयाचा नसून आधुनिक गद्याविष्कारातील विकसित कथारूपाचा विचार करावयाचा आहे. मुद्रणाचा शोध न लागल्याने केवळ मौखिक स्वरूपात हे कथात्म पद्य वाङ्मय पिढ्या नू पिढ्या चालत आले, एवढेच नव्हे तर, जे काही तुरळक गद्य साहित्य आज उपलब्ध आहे, तेही बहुश: लोकसाहित्याच्या मौखिकतेच्या स्वरुपातीलच होय! इंग्रजी कालखंडातील पहिले महत्त्वाचे परिवर्तन म्हणून मुद्रणशोधाचा निर्देश करावा लागेल. भारतात मुद्रणकला आल्यानंतरच साहित्याच्या इतिहासाची दिशा बदलली. प्राचीन व आर्वाचीन किंवा आधुनिक अशा शब्दांनी हा बदल लक्षात घेताना केवळ कालनिर्देशच अभिप्रेत नसून साहित्याच्या स्वरुपातील आमूलाग्र बदलही या शब्दात अभिप्रेत आहे.

## इंग्रजी कालखंड-मर्यादा व वर्गीकरण

मराठी राज्याच्या अस्तापूर्वीचे साहित्य व इंग्रजी कालखंडातील साहित्य या कालखंडांना जोडणारा असा हा इंग्रजी कालखंड. या काळातील इंग्रजांचे धोरण अतिशय व्यापक होते. केवळ राजकीय नव्हे, तर सांस्कृतिक हेतूने त्यांनी राज्यकारभाराची सूत्रे हातात घेऊन एक वैचारिक क्रांती निर्माण केली. शिक्षणप्रसार साधण्याच्या या त्यांच्या हेतूतून व मराठी साहित्य आपल्या मार्गाला लागू शकले.

इ.स. १८०० ते १८८५ असा हा कालखंड होय! साहित्य इतिहासात वाङ्मयीन घटनांवरून कालखंड निश्चित करण्याच्या प्रघातानुसार १८७४हे साल मराठी साहित्यात निबंध मालेमुळे महत्त्वाचे मानले जावे हे साहाजिकच होय! परंतु कथा साहित्याचा विचार करता 'खरी मराठी कथा' सुरू करणाऱ्या ह.ना.आपट्यांचा कथा १८८६च्या निबंधचंद्रिका व मनोरंजन या नियतकालिकातून आल्या त्यामुळे कथा साहित्यातील टप्पा म्हणून या कालखंडाची मर्यादा १८८५ धरणे हे उचित ठरते. विचाराच्या सोयीच्या दृष्टीने जरी या ८५ वर्षांचे दोन भाग करता येणे शक्य असले, तरी या धावत्या समालोचनात त्याची आवश्यकता भासणार

नाही. या ८५ वर्षातील कथेत होत गेलेले सर्वच बारीक सारीक बदल येथे नमूद करणे ज्याप्रमाणे शक्य नाही तद्वतच नियतकालिकांतील कथा, स्वतंत्र कथा, प्रेरित कथा अशा अनेक अंगांनी होऊ शकणारा विचारही येथे अभिप्रेत नाही. या कालखंडातील कथेचे सर्वसाधारण स्वरूप, या काळातील प्रमुख प्रवृत्ती व कथा, कथाकार असा ढोबळ विचार येथे थोडक्यात करावयाचा आहे.

**करमणूकपूर्वकालीन कथा**

पोर्तुगीजांच्या राजवटीबरोबर भारतात छापण्याची कला आली. यानंतर मराठीतील गद्य ग्रंथांची संख्या झपाट्याने वाढत गेली. कथांच्या पुस्तकांचाही अर्थात यात समावेश होताच. मराठीतील पहिले गोष्टीचे उपलब्ध छापील पुस्तक म्हणजे 'बालबोध मुक्तावली' हे होय। तंजावरच्या सरफोजी राजांनी इ.स. १८०६ मध्ये इसापनितीचा हा अनुवाद प्रसिद्ध केला. या पुस्तकाने छापील कथांची परंपरा सुरू केलेली दिसते.

यानंतरच्या १८९० पर्यंतच्या कालखंडामधील कथांत आपल्याला प्रामुख्याने दिसणारे प्रवाह पुढीलप्रमाणे-

१) **अनुवाद** - इंग्रजी साहित्याचा संपर्क व फारशी भाषेचा संपर्क यातून या सुरुवातीच्या कथांत अनुवादाची एक लाट येऊन गेल्याचे दिसते. हितोपदेश (१८१५) पंचतंत्र (१८१५), सिंहासनबत्तिशी (१८२४) ही सुरुवातीच्या काळातील अनुवादित कथांची पुस्तके. याशिवाय स. का. छत्र्यांनी केलेली बालमित्र, बोधकथा ही भाषांतरे, राजा प्रतापादित्याचे चरित्र ही याच प्रवाहातील पुस्तके होत. मराठीत कथेच्या जाण आलेल्या किंवहुना येऊ घातलेल्या या सुरुवातीच्या कथांतच नव्हे तर इतर साहित्यप्रकारातही ही अनुवादाची लाट आपल्याला आढळून येते, याचे प्रमुख कारण इंग्रजी राजवट हेच होय.

२) **नीतिपर, बोधकथा** - एकूणच साहित्याची बाल्यावस्था ढोबळमानाने पाहू जाता साहित्याच्या विकासाची सुरुवात ही नीतीपरंपरेतून झाल्याचे दिसते. किंवहुना वेगळ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास साहित्याचा उपयोग त्याच्या सुरुवातीस नीतितत्त्वांच्या प्रसाराचे साधन म्हणूनच होतो.

मराठी कथेच्या सुरुवातीच्या या काळात ही नीती कथांचे प्रमाण विपुल होते. बाळशास्त्री जांभेकरांच्या बोधकथा: दुसरा भाग (१८३१), विष्णुशास्त्री बापट यांनी लिहिलेले नीतिदर्पण (१८३७), मिसेस कॅन्डी यांच्या मुलांसाठी लिहिलेल्या, 'बोधाच्या गोष्टी' असे कितीतरी बोधप्रधान साहित्य विशिष्ट हेतूपूर्तीसाठी या सुरुवातीच्या काळात लिहिले गेले.

३) **अद्‌भुतरम्य व शृंगारकथा** - अरबी भाषेतील अनुवादाच्या रुपाने पण अद्‌भुत रसाचा समावेश असणाऱ्या व शृंगारिक अशा अनेक कथांचे संग्रह या करमणूक पूर्व काळात आढळतात. कृष्णशास्त्री चिपळूणकरांचा 'अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी' डॉ. रामजी गणेशजी यांचा स्त्री चरित्र हे ग्रंथ या प्रवाहाचे प्रतिनिधिक म्हणून सांगता येतील.

४) **चातुर्यकथा** - 'मराठी भाषेतील सुरस गोष्टी,' 'शृंगार सुंदरी. आणि 'मनोवेधक स्त्री पुरुषांच्या चमत्कारिक गोष्टींचा संग्रह, चमत्कारिक गोष्टींचे आठ भाग,' 'मनोवेधक' गोष्टींचे तीन चार संग्रह वगैरे कथासंग्रहातून अद्‌भुत व शृंगाराबरोबरच चातुर्यकथांचे ही मिश्रण दिसून येते.

५) **ऐतिहासिक कथा** - या कथांतून इतिहास कमी व कल्पित अधिक हा प्रकार होता. या प्रवाहातील लक्षणीय असे पुस्तक, म्हणजे घाशीराम कोतवाल (१८६३) हे मोरोबा कान्होबा लिखीत २८ गोष्टींचे पुस्तक होय. यात 'ऐतिहासिक' असे काही नाही. लोकहितवादींना गोष्ट वा कथा या प्रकाराची फारशी माहिती नसली तरी त्यांनी लिहिलेल्या ऐतिहासिक कथा मात्र बऱ्याचशा इतिहासास धरून आहेत.

या पाच प्रमुख प्रवाहांतील संग्रहांचा विचार केल्यावर या काळातील नियतकालिकांतील कथांचा विचार ओघाने येतो. परंतु वरील प्रवाहात निर्देशिल्यापेक्षा काही वेगळी कथा नियतकालिकातूनही येत नव्हती. बहुतेक कथा या फारशी अरबी वा इंग्रजी कथेच्या आधाराने मराठीत आल्याने तिला स्वत्व नव्हते, ती त्यावेळचे जीवन दर्शन घडवू शकत नव्हती. नियतकालिकांचे ध्येयच ज्ञानप्रसार व लोकजागृती हे असल्याने त्यातील कथाही बोध करणाऱ्या, साधनभूत अशा झाल्या. याकाळातील प्रमुख नियतकालिके म्हणजे 'मराठी ज्ञानप्रसारक', 'विविधज्ञान विस्तार', 'निबंध चंद्रिका', 'केरळ कोकिळ' इत्यादी होत. या कालखंडातील एकूण कथेबद्दल "इंग्रजी भाषेतील बोध प्रधान गोष्टींचे संस्कार घेऊन आलेली कथा मुलांना नीतिपाठ देण्याचे कार्य करीत होती, तर अरबी व फारशी भाषेतील कथांचे संस्कार घेऊन आलेली कथा वाचकांना अद्भुत विश्वात नेत होती, शृंगार रसात डुबवीत होती.

## नियतकालिके व मराठी कथा

एकूणच मराठी कथेच्या जडणघडणीत नियतकालिकांचा वाटा फार महत्त्वाचा आहे. मराठी नियतकालिकांच्या इतिहासात केवळ वाङ्मयीन कृती प्रसिद्ध करण्याचा संकल्प सोडून सातत्याने कार्य केलेली नियतकालिके कमी आहेत. ज्ञान आणि मनोरंजन साधण्याच्या हेतूने बहुश: नियतकालिके चालविली जात. स्वातंत्र्यपूर्व काळात ज्ञानप्रसाराबरोबरच लोकजागृतीचे उद्दिष्ट ही नियतकालिकांनी बाळगले. मराठीत इ.स. १८३२ मध्ये निघालेल्या पहिल्याच, 'दर्पण' या नियतकालिकाचा हेतू (चालू काळाची वर्तमाने कळविणे आणि योग्यतेस येण्याचे मार्ग दाखविणे), बऱ्याचशा नियतकालिकांच्या नावांतील 'ज्ञान' हा शब्द (ज्ञानोदय १८४२, ज्ञानप्रकाश १८४९, दिग्दर्शन व मराठी ज्ञानप्रसारक१८५०, विविध ज्ञान विस्तार...वगैरे) यावरून या नियतकालिकांचा बोधवादी दृष्टिकोण स्पष्ट होतो.

या बोधवादी स्वरुपामुळे ललित साहित्याच्या सर्वच प्रकारांकडे नियतकालिकांचे लक्ष उशीरा व कमी प्रमाणात गेले. ज्या काही कथा प्रसिद्ध होत, त्यांचे स्वरुप काही तत्त्व बिंबविणाऱ्या साधनाचे, तात्पर्य कथेसारखे असे. ती कथादेखील बहुधा इंग्रजी वा फारशी कथावस्तूचे वा कथेचे भाषांतर असे. हरि नारायण आपट्यांनी मराठी कथेला लक्षात येण्याजोगे महत्त्व आपल्या करमणूक पत्रातून दिले. त्यानंतरच्या कथेच्या विकासात नियतकालिकांनी फार मोठे काम केले. मराठीतील स्वातंत्र्योत्तर काळातील आजपर्यंतच्या ७५% नियतकालिकांतून तरी कथा असतेच. कित्येक कथाकार या नियतकालिकांमुळे मराठी कथाक्षेत्रात उदय पावले. ज्या 'कोंकराची कथा' या कथेने अरविंद गोखल्यांकडे लक्ष वेधून घेतले ती कथा देखील सत्यकथेचा ४५च्या दिवाळी अंकात प्रथम प्रकाशित झालेली होती.

## करमणूक व मनोरंजन कालखंड

इंग्रजी कालखंडात अद्भुत व अवास्तवावर आधारलेल्या मराठी कथेला कादंबरीकार म्हणून मान्यता पावलेल्या हरीनारायण आपट्यांनी प्रथम वास्तवाच्या सृष्टीत आणले. १८९०च्या ऑक्टोबरात त्यांनी करमणूक हे नियतकालिक काढले. या पहिल्याच अंकावर "लहानांपासून, थोरांपर्यंत सर्व स्त्रीपुरुषांचे मनोरंजन करून ज्ञानदान देणारे पत्र" अशी जाड टीप छापलेली होती. या अंकातून काय काय साहित्य येणार याची जी यादी पहिल्या अंकात होती त्यात सुरुवातीलाच "आळीपाळीने संपणाऱ्या दोन मोठ्या गोष्टी' व 'दोन चार अंकात संपणाऱ्या अशा लहान चटकदार गोष्टी' असा उल्लेख येतो. परंतु "कोणताही कलेचा-त्यात विदग्ध वाङ्मय आलेच, हेतू केवळ आनंदोत्पादन हा नसून सत्याचा व नीतीचा आनंदबोध हा प्रधान हेतू आहे.' हा त्यांचा दृष्टिकोन असल्याने नीतिबोध हा त्यांच्या कथेचा मध्यवर्ती घटक बनल्याचे दिसते. यामुळे साहजिकच सत् व असत् यांतील संघर्षाला

पोषक व सत् विजयी होईल अशा बेताने कथानके या नियतकालिकातून आली. या त्यांच्या जाणिवेवरून अद्भुताकडून वास्तवाकडे कथा वळत असल्याची चिन्हे दिसतात. हरिभाऊंची प्रतिभा कादंबरीकाराची असल्याने त्यांच्या कथांचा आवाका लघुकादंबरी सारखा होता. कादंबरीपेक्षा कथालेखनाचे तंत्र काही वेगळे असल्याची जाणीव त्यांच्या आरंभीच्या कथांवरून तरी त्यांना नव्हती.

'आजकालच्या गोष्टी...' व 'स्फुट गोष्टी' ही करमणुकीची प्रमुख आकर्षणे होती. त्यांच्या अंकातील कित्येक स्फुट गोष्टी निनावी असल्याने लेखकाबद्दल दुमत होण्यास वाव आहे, परंतु भाषाशैली व रचनाशैली वरुन हरिभाऊंच्याच या कथा असाव्यात हा निष्कर्ष निघतो. त्या काळातील पद्धतीनुसार कथांवर लेखकाचे नाव टाकले गेले नाही. हे खरे असले तरी कथा निनावी असण्याचे प्रमुख कारण कादंबरी हाच साहित्यप्रकार अतिशय लोकप्रिय असल्याने कथांवर नाव टाकण्याइतके वाचकाला वा लेखकाला कथेचे महत्त्वच नव्हते.

हरिभाऊंचा पिंड कादंबरीकाराचा असल्याने स्फुट गोष्टी देखील त्यांनी बऱ्याच प्रदीर्घ लिहिलेल्या दिसतात. कादंबरीप्रमाणेच 'अपकारांची फेड उपकारांतीच', दिवस असे होते,' काळ तर मोठा कठीण आला' अशा प्रकरणप्रधान कथा त्यांनी प्रसिद्ध केल्या. घटनांची गुंतागुंत, पात्रांची गर्दी, वर्णनातील तपशील या सर्वांमुळे या कथा लघु कादंबरीप्रमाणे मनावर परिणाम साधतात.

'हरिभाऊंनी स्फुट गोष्टी' तून अनेक प्रयोगही केले. 'लंबोदराची तिरपीट,' 'डिस्पेपशिया', 'चिमणमामांचे वुईल' अशा मानवी स्वभाव, प्रसंगातील विसंगतीवर रचलेल्या विनोदी कथांबरोबरच दोन चित्रे, थोड्या चुकीचा घोर परिणाम अशा करुणरसपर्यवसानी कथाही त्यांनी लिहिल्या. बोधप्रधानते मुळे तीन फुले, प्रेम की पैसा, उपकार फळास आला अशा कथा, सत्य-प्रेम-कलह, मानिनी या सारख्या ऐतिहासिक कथा, गोदावरीने काय केले, गरिबीचा संसार अशा व्यक्तिचित्रणात्मक, घरजावई, रोज पडणारी गोष्ट अशा कौटुंबिक कथा असे विविध कथाप्रकार त्यांनी करमणूकीतून हाताळले. मध्यमवर्गीय पांढरपेशा वर्गाच्या सुखदु:खाचे चित्रण त्यांच्या बहुतेक कथांतून हमखास असतेच. वास्तवाची ही जोड मिळाल्याने त्यांच्या कथा परिणामकारक झाल्या. पण बोधवादी विचारसरणीमुळे काही मर्यादाही त्यांच्या कथांवर पडल्या. भाष्य करणे, घटनाप्राधान्य, योगायोगांची विपुलता, सत्प्रवृत्तीच्या विजयामुळे होणारा सुखान्त शेवट या काही मर्यादा होत.

असे असले तरी करमणूकीतून लिहिलेल्या कथेतून त्यांनी मराठी कथेला वास्तवाच्या सृष्टीकडे आणले, आशय व अभिव्यक्तीच्या दृष्टीने काही आकार ते देऊ शकले व त्यांच्या या पायाभूत प्रयत्नांतून खरी मराठी कथा सुरू झाली हे लक्षात घेता "मराठी कथेच्या जनकत्वाचा मान हरिभाऊचांच आहे" याबद्दल दुमत उरत नाही.

हरिभाऊंचे 'करमणूक' पत्र १९१७ पर्यंत चालू होते. या नियतकालिकाच्या पहिल्या अंकानंतर म्हणजे इ. १८९५ च्या जानेवारीत का. र. मित्र यांनी 'मासिक मनोरंजन' सुरू केले. या नियतकालिकाच्या कालखंडाच्या मर्यादा निश्चित करताना तीन उपकालखंड लक्षात घ्यावे लागतात. १८९५ ते १९०९, १९१० ते १९२६ व १९२७ ते १९३५. १९३५ फेब्रुवारी मध्ये मासिक बंद झाले.

ह.ना.आपट्यांनी करमणुकीतन स्फुट गोष्टीचे बीजारोपण केले, तर मनोरंजनातून का. रा. मित्रांनी या कथेला संपूर्ण कथा बनविली. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता:' हे ब्रीदवाक्य मलपृष्टावर छापलेल्या या नियतकालिकाने मराठी कथेबरोबरच नियतकालिकांच्या परंपरतेही महत्त्वाची भर टाकली. स्त्रीवाचकांची वाढती संख्या, स्त्रियांची वाढती सुशिक्षितता व साक्षरता आणि यातून वाढती गरज लक्षात घेऊन का. र. मित्रांनी लेखिकांना पुढे आणले. मनोरंजनाचेच दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणून

मनोरंजनाने परप्रान्तीय साहित्यातील कथांकडे वेधलेले लक्ष देखील उल्लेखनीय आहे. याशिवाय मनोरंजनानेच विशेषांकांची व **१९०९ पासून दिवाळी अंकांची सुरुवात केली.**

मनोरंजनाच्या पहिल्या उप कालखंडात प्रसिद्ध झालेल्या कथांचे स्वरुप स्फुट गोष्टींपेक्षा फारसे वेगळे नव्हते. १९१० पर्यंत निनावी या टोपणनावाने कथा प्रसिद्ध केल्या गेल्या या कथांचे स्वरुपही कौटुंबिक पार्श्वभूमीवरील, घटना प्रधान, बोध प्रधान व पाल्हाळिक होते. संपूर्ण कथा म्हणजे छोटी कादंबरी हीच दृष्टी या कालखंडात प्रसिद्ध झालेल्या कथांतून दिसते. वसंतलीला, मी चतुर्भुज कसा झालो, अभिमान अशा सांसारिक कथा या काळात लिहिल्या गेल्या. सांसारिक कथांत प्रेमभावनेच्या चित्रणाला झालेली सुरुवात ही मात्र पुढील वि.सी. गुर्जर व ना. सी. फडके यांच्या कथांचे स्वरूप पाहता महत्त्वाची गोष्ट म्हणता यावी. भला डॉक्टर, विचारी गुलाब अशा कथांतून बोधही केला गेला आहे तर प्रसंग व अतिशयोक्तीवर आधारलेल्या हिमतबहाद्दर, 'दोन्ही मागे उभयान्वयी' अशा विनोदी कथा ही होत्या.

मनोरंजन मासिकाच्या दुसऱ्या कालखंडापासून कथेला नियतकालिकांतून महत्वाचे स्थान महत्व मिळू लागले. या कालखंडात कथेच्या स्वरुप बदलाबरोबरच कथेचे प्रयोजनही बदलू लागले. 'स्फुट गोष्टी' या स्वरुपात प्रसिद्ध होणाऱ्या लघुकादंबरीवजा गोष्टी मागे पडून मराठी कथेचा संपूर्ण कथेच्या दिशेने विकास होऊ लागला आणि त्याबरोबरच कथेतील बोधवादी दृष्टिकोन मागे पडून कथा अधिक मनोरंजनप्रधान होऊ लागली. उद्यान, चित्रमय जगत, नवयुग ही नियतकालिके 'कथा' या साहित्यप्रकाराला महत्त्वाचे स्थान देऊ लागली.

मनोरंजन मासिकाच्या या कालखंडातील दोन महत्वाचे टप्पे म्हणजे वि. सी. गुर्जरांची व दिवाकर कृष्णाची कथा हे होत. दिवाकर कृष्णांचा विचार नंतरच्या (१९२० नंतरचा!) कालखंडात केला जातो. वि. सी. गुर्जरांनी कथेबद्दल वाचकांच्या मनात गोडी निर्माण केली. हरिभाऊ हे मराठीतील आद्य कथाकार म्हणून त्यांचे स्थान महत्त्वाचे मानले जाते तसेच गुर्जरांनी आपल्या 'संपूर्ण गोष्टीतून'' मराठी कथेचा चेहरामोहरा बदलला. दिवाकर कृष्णांनी मराठी घटनाप्रधान कथेचा विकास मनोविश्लेषणाच्या दिशेने नेऊन तिला अंतर्मुख बनविले. १९२२च्या मे मनोरंजनमध्ये त्यांनी लिहिलेल्या 'अंगणातला पोपट' या कथेद्वारा त्यांनी ही परंपरा चालू केली. गुर्जरांच्या बऱ्याच कथा या अनुवादित आहेत. मनोरंजनात १९०८ साली प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या चंद्रिका, प्रेमाचा परिणाम याही कथा अनुवादित वाटतात. गुर्जरांनी १९६२ पर्यंत अव्याहतपणे कथालेखन केले. परंतु त्यांच्या लिखाणाच्या स्वरुपाच्या, विकासाच्या दृष्टीने मनोरंजनचा हाच कालखंड महत्वाचा मानण्यात येतो. त्यांचे अनुवाद कौशल्य वादातीत होते. त्यांच्या एकूण कथाविश्वावर प्रभात कुमार मुखर्जींच्या कथांचा परिणाम जाणवतो. कथा ही कादंबरीपेक्षा निराळी असल्याची जाणीव, तिच्या आशय व रचनेतील रंजकत्वाची जाणीव, शृंगार व प्रेमविषयक कथाबीजे फुलविण्याची तिची क्षमता ही गुर्जरांच्या कथेने करून दिली. रहस्यप्रधान कथानकांची रचना करून अनपेक्षितरित्या वाचकाला धक्का देण्याचे तंत्र ही त्यांनीच मराठीत रूढ केले. योगायोग घडवून आणून आश्चर्याबरोबर वाचकाला आनंदाचा धक्का देणे हे त्यांच्या कथांचे सूत्र आहे. गुर्जरांच्या कथेचे एकूण म हत्त्व लक्षात घेता, ''हरिभाऊ आणि ना. सी. फडके यांना जोडणारा महत्वाचा दुवा म्हणजे वि.सी.गुर्जर.'' या अभिप्रायातील गुर्जरांचे कथेच्या विकासातील स्थान स्पष्ट होते.

मनोरंजनच्या या कालखंडात मनोरंजन व इतर समकालीन नियतकालिकांतून लक्षणीय लिखाण करणारे इतर लेखक / लेखिका - **कृष्णाजी केशव गोखले** यांच्या कथांतील मध्यवर्ती कल्पना परकीय व विकास करताना घेतलेल्या स्वातंत्र्यात कलम महाराष्ट्रीय जीवन

प्रसंगांचे असे. **सहकारी कृष्ण** यांचा दृष्टिकोन ''सांसारिक हवालदिल परिस्थितीचे चित्र कसल्याही काल्पनिक रंगछटा न करता... जसेच्या तसे त्याच्या डोळ्यासमोर धरून त्याच्या मनोवृत्तीला तेजस्वी वळण द्यावे'' असा असल्या कारणाने यांच्या कथा समाजाला बोध करणाऱ्या अशा होत्या. याच हेतूने प्रेरित होऊन त्यांनी कुंटुबशिक्षण माला काढली. **वा.म. जोशी** - वा.म. जोशी कथा लिहिताना तत्त्वप्रतिपादनासाठी जरी कथा लिहीत नसले, तरी कोणते ना कोणते तत्त्व काढण्याचा त्यांचा परिपाठ होता. त्यांच्या कथेचे स्वरुप पाल्हाळिक, पारंपरिक असेच होते. लघुनिबंध व कथा या सीमारेषेवर असणाऱ्या लहान कथातून कथाबीजांचा अभाव व इतर कथा जुन्या वळणाच्या पाल्हाळिक अशाच आहेत. **शि. म. परांजपे** - व्याजोक्ती, वक्रोक्ती व उपहासाच्या आधाराने उत्कट देशाभिमानाच्या कथा काळकर्त्या परांजप्यांनी लिहिल्या. या देशद्रोह व ध्येयशून्यतेवरील त्यांच्या राजकीय कथांतून भावोत्कटते बरोबरच कल्पनाविलासही भरपूर दिसून येतो. **श्री. कृ. कोल्हटकर** - कोल्हटकरांच्या नाट्यलेखनांतील अतिरंजितता, रहस्यप्रियता, चमत्कृती हे विशेष त्यांनी लिहिलेल्या थोड्याफार कथांतूनही जाणवतात. उपहासपूर्ण सामाजिक लेखांतून त्यांनी केलेल्या लिखाणाचे स्वरुप बरेचसे कथेच्या स्वरुपाचे आहे. **न. चि. केळकर** - न.चि. केळकरांनीही फार थोड्या कथा लिहिल्या. त्यातही स्वभाव रेखाटने अधिक असल्याने कथाबीजांचा फारसा आढळ नाही. **काशीताई कानिटकर** - यांच्या कथांचे स्वरुप बालबोध असे व नीतितत्त्व प्रतिपादनाच्या हव्यासामुळे बोधप्रधान झाले आहे. वर्णनांतील पाल्हाळामुळे या कथा रचनेच्या दृष्टीनेही विस्कळीत अशाच झाल्या आहेत. कथावस्तूत रहस्य व गुंतागुंत आढळते. मनोरंजन मासिकाच्या ध्येयातून नुकत्याच शिक्षित होऊ लागलेल्या होत. **वामनसुता** या टोपणनावाने कथालेखन करणाऱ्या लेखिकेच्या नावाने ७-८ कथा मिळतात. या काळातील कथेतील गुणदोषांचा आढळ यांच्याही कथेत होतो. भाष्य करण्याची पद्धत, ओघवती भाषा, वाचकांशी हितगुज हे सर्व यांच्या कथात दिसून येते. **गिरिजाबाई केळकर** - यांच्या लिखाणाची सुरुवात या कालखंडातील असली तरी विकास पुढील कालखंडातच झाला. टायपिक स्वभावचित्रांच्या साहाय्याने सामाजिक प्रश्नांचा त्यांनी ऊहापोह केलेला दिसतो, त्यामुळे उपदेश प्रधान असे त्यांच्या कथांचे स्वरुप झाले आहे.

या काही प्रमुख लेखकांबरोबर इतरही अनेक लहान मोठे कथालेखक उदयास आले. १९२० साली मनोरंजनाचे संपादक का.र. मित्र हे निधन पावले. त्यांच्या नंतर मनोरंजन मासिकाने भरीव अशी कामगिरी केली नाही. १९२६ साली सुरू झालेला रत्नाकर मासिकाने मराठी कथेच्या इतिहासातील तिसरा कालखंड सुरू केला. मनोरंजनच्या या कारकिर्दीतील कथेच्या दृष्टीने असे महत्त्वाचे मनोरंजनचे कार्य म्हणजे मनोरंजन मासिकाने मराठी कथेच्या विकासाचा जाणिवपूर्वक प्रयत्न केला, व तो यशस्वीही झाला.

मराठी कथेच्या इतिहासातील महत्त्वाचा असा हा तिसरा कालखंड होय! १९२६ ते १९४५ या एकोणीस वर्षांच्या कालखंडाला लघुकथेच्या आत्यंतिक उत्कर्षाचा कालखंड म्हणूनच संबोधिले गेले आहे. १९२६ ला सुरु झालेल्या रत्नाकरनंतर लघुकथेला प्रामुख्याने वाहिलेले यशवंत मासिक दोनच वर्षांनी सुरु झाले. त्यानंतर किर्लोस्कर, स्त्री, मनोहर, ज्योत्स्ना, कला, पारिजात, समीक्षक ध्रुव अशी विविध साहित्यिक मासिके निघत गेली. या मासिकांनी मराठी कथेला प्रमुख स्थान देऊन तिचे इतर साहित्यप्रकारातील महत्त्व वाढवले व त्या बरोबरच लेखकांची एक प्रभावळच मराठी कथाक्षेत्रात निर्माण केली. सामाजिक जाणिवेबरोबरच तंत्रकौशल्य, कलात्मकता, सौंदर्य साधना या गोष्टींचा या कथेने विचार केला. यशंवत मासिकाने कालखडांच्या पूर्वार्धात व किर्लोस्कर मासिकाने उत्तरार्धात केलेल्या कार्याचे स्वरुप व महत्त्व लक्षात घेता या कालखंडाचा निर्देश यशवंत किर्लोस्कर कालखंड असाच करण्यात येतो.

## यशवंत किर्लोस्कर कालखंड

लघुकथेला या कालखंडात कादंबरीपेक्षाही अधिक लोकप्रियता लाभून मराठीत लघुकथा रूढ झाली. पहिले महायुद्ध होऊन गेले व एकूणच जीवनात औद्योगिक क्रांतीमुळे बदल घडून आला. जीवनातील मूल्ये, दृष्टिकोण आमूलाग्र बदलून आयुष्य गतीला विलक्षण वेग मिळावयास सुरुवात झाली. याचा परिणाम म्हणूनच मराठीतही कादंबरी वाचण्यास लागणाऱ्या स्वस्थपणाचा अभाव सुरू झाला.

लघुकथा व कथा यांचे स्वरुपही आंतर्बाह्य बदलू लागले. पूर्वीच्या कथेतील घटनाप्राधान्य कमी होत जाऊन दिवाकर कृष्णांच्या टप्प्यापासून मराठी कथा मनोविश्लेषणाकडे झुकू लागली. स्वभाव रेखनाला अधिक प्राधान्य मिळू लागले. बाह्य स्वरुपही अधिक आकर्षक, रेखीव बनण्यास सुरुवात झाली. याबरोबरच तिच्यातील विषयांची व्याप्ती देखील विस्तृत होत गेली. मध्यमवर्गीय जीवनातील सुखदु:खांशी निगडित अशा प्रश्नांची उकल करण्यात व मध्यम वर्गीयांना मार्गदर्शन करण्यात मग्न असलेल्या करमणूक मनोरंजन कालखंडातील कथा या काळात समाजाच्या इतर उपेक्षित वर्गांचाही विचार करू लागली. व्यक्ती जीवनातील गुंतागुंतीच्या भावभावनांचा, प्रश्नांचा परामर्ष घेतानाच तिच्या जीवनविषयक दृष्टिकोणात सूक्ष्मता येऊ लागली. पाश्चात्य कथेत येऊन गेलेल्या तंत्र युगाचे लोण मराठी कथेत आले. या जाणिवेतून कथेच्या जडणघडणीतील कलात्मकता, प्रयोगशीलता वाढीस लागली. केवळ बोधाचे साधन वा मनोरंजनाचे साधन असे पूर्वीचे स्वरूप जाऊन कथाकार कथेकडे आत्मप्रकटीकरणाचे माध्यम म्हणून पाहू लागले.

ना.सी. फडके व वि.स. खांडेकर ही या कालखंडातील दोन महत्त्वाची नावे होत. या कालखंडानंतरही सातत्याने व विपुल कथालेखन केले असले तरी या कालखंडातील एकूण कथाविश्वावर त्यांनी आपला ठसा निर्माण केला, काळाच्या दोन प्रवृत्तींचे आणि पर्यायाने काळाचे प्रतिनिधित्व केले. या दृष्टीने या दोघांच्या कथेचा थोडक्यात परिचय करून देणे हे इतिहासप्राप्त आहे. दिवाकर कृष्णांनी मनोरंजन व यशवंत किर्लोस्कर कालखंडाचा सांधा जोडून दिला. या दोघांनी हा कालखंड घडविला.

**मोहन पाठक**

### भारतातून आजवर प्रक्षेपित केलेले उपग्रह

| क्र. | यानाचा प्रकार | उड्डाणाची तारीख | परिणाम |
|---|---|---|---|
| १. | एसएलव्ही-३ ई१ | १० ऑगस्ट १९७९ | अपयशी |
| २. | एसएलव्ही - ३ ई२ | १८ जुलै १९८० | यशस्वी |
| ३. | एसएलव्ही - ३ डी१ | ३१ मे १९८१ | यशस्वी |
| ४. | एसएलव्ही - ३ डी२ | १७ एप्रिल १९८३ | यशस्वी |
| ५. | एएसएलव्ही - १ | २४ मार्च १९८७ | अयशस्वी |
| ६. | एएसएलव्ही - डी२ | १३ जूलै १९८८ | अयशस्वी |
| ७. | एएसएलव्ही- डी३ | २० मे १९९२ | यशस्वी |
| ८. | पीएसएलव्ही- डी१ | २० सप्टेंबर १९९३ | अयशस्वी |
| ९. | एएसएलव्ही- डी४ | ४ एप्रिल १९९४ | यशस्वी |
| १०. | पीएसएलव्ही- डी२ | १५ ऑक्टोबर १९९४ | यशस्वी |
| ११. | पीएसएलव्ही- डी३ | २१ मार्च १९९६ | यशस्वी |
| १२. | पीएसएलव्ही- सी१ | २९ सप्टेंबर १९९७ | यशस्वी |
| १३. | पीएसएलव्ही- सी२ | २६ मे १९९९ | यशस्वी |
| १४. | जीएसएलव्ही- डी१ | १८ एप्रिल २००१ | यशस्वी |
| १५. | पीएसएलव्ही- सी३ | २२ ऑक्टोबर २००१ | यशस्वी |
| १६. | पीएसएलव्ही- सी४ | १२ सप्टेंबर २००२ | यशस्वी |
| १७. | जीएसएलव्ही- डी२ | ८ मे २००३ | यशस्वी |
| १८. | पीएसएलव्ही- सी५ | १७ ऑक्टोबर २००३ | यशस्वी |
| १९. | जीएसएलव्ही- एफ०१ | २० सप्टेंबर २००४ | यशस्वी |
| २०. | पीएसएलव्ही- सी६ | ५ मे २००५ | यशस्वी |

**पुस्तक परिचय**

# इथे ओशाळला विधाता

श्रीमती शैलाताई येडेकर यांचे हे पुस्तक म्हणजे प्रेरणा देणारे उत्तम पुस्तक आहे. उमेद हरण्याची सवय असणाऱ्यांनी हे पुस्तक संग्रहात ठेवून याचे पारायण करावया हवे - संपादक

"इथे ओशाळला विधाता" हे शीर्षक असलेले आत्मचरित्रात्मक व चरित्रात्मक पुस्तक म्हणते निराशेच्या गर्तेत सापडून नशीबाला दोष देणाऱ्याच नव्हे तर शरीर मनाने धडधाकट असणाऱ्यांच्या मनातही जबरदस्त इच्छाशक्ती निर्माण करू शकेल अशी ऊर्जा आहे. प्रतिकूलतेवर मात करायची असते म्हणजे काय याचा धडा हे पुस्तक वाचून मिळतो. "पुस्तक वगैरे लिहायला मी कोण मोठी नाही" असे नम्रपणे शैलाताईंनी म्हटले असलं तरी रूढ अर्थाने त्यांचे 'मोठे' नसणे हेच या पुस्तकाचे यश आहे. शैलाताईंच्या विनयशील स्वभावातून त्यांनी असे म्हटले आहे हे पुस्तक वाचून झाल्यावर ध्यानात येते. 'दिव्यत्वाची जेथे प्रचिती' म्हणजे काय हे ही जाणले आणि हात जोडले जातात.




प्रेरणादायी अशा या पुस्तकाची विभागणी 'मी' 'माझी माणसं' 'ललित आणि अध्यात्म' आणि 'आमची शैलाताई' अशा चार विभागांमध्ये करण्यात आलेली आहे. या सर्व भागांचे संपादन श्रीमती अनुपमाताई उजगरे यांनी केले आहे.

श्री संत समर्थ रामदास स्वामींच्या साहित्याचा शैलाताईंच्या जीवनावर, विचार शैलीवर व जडणघडणीवर अतिशय खोलवर परिणाम झालेला आहे. त्यांच्या 'मी' या आत्मचरित्रात्मक भागात समर्थांच्या साहित्याचा संदर्भ वारंवार आलेला आहे. मी कोणी मोठी लेखिका नाही असे जरी शैलाताई म्हणत असल्या तरी या भागातील सहा लेख वाचताना नितळ शैली, साधी वर्णन पद्धती आणि भाषेवरील प्रभुत्व हे सतत जाणवत राहते. आपल्या जडणघडणीमधील महत्त्वाचे टप्पे व महत्त्वाची माणसे यांचा स्वतंत्र लेखांतून शैलाताई उल्लेख करतात. एम्.ए.च्या दुसऱ्या वर्षाला असताना कराव्या लागलेल्या ऑपरेशनची हकिकत मन हेलावून टाकणारी आहे. "बेडवर पडल्या

पडल्या मनात येत होतं ते काळ्या पाण्यावर एकटे एका खोलीत डांबलेले सावरकर... स्वत:च्या धैर्याची परीक्षा देण्यासाठी एक सुई बोटातून आरपार घालून चेहरा निर्विकार ठेवलेले मदनलाल धिंग्रा...मी मनात या दोघांची प्रार्थना करीत होते की मला धैर्य द्या, सहनशक्ती द्या... ''(पृ.९) हे वर्णन वाचून शैलाताईंच्या मनाची अवस्था सहज समजते. प्रस्तावनेमध्ये प्रा. प्रवीण दवणे यांनी म्हटल्या प्रमाणे ''अध्यात्माच्या कृतिशील अधिष्ठानाने त्यांच्या (शैलाताईंच्या) जगण्याला परमार्थाचा स्पर्श दिला. या अधिष्ठानाची प्रचिती स्वत:विषयी जे शैलाताईंनी लिहिलंय त्यातून वारंवार येते. त्यांचे मनोरंजन ग्रंथालय, अपंगांसाठी कार्य करण्याच्या हेतूने त्यांनी चालू केलेली स्वयंसिद्ध ही संस्था या सर्वांची माहिती वाचली की कर्मयोग जगणाऱ्या शैलाताई अधिक समजतात.

पुस्तकातील 'माझी माणसं' या दुसऱ्या भागामध्ये आईवडिल आणि भावंडांबरोबरच गुरूजनांबद्दल अतिशय भारावून शैलाताई लिहितात, ''तसा मला माझ्या आयुष्यात पुष्कळ गुरूजनांचा आधार घ्यावा लागला आहे, आणि ह्यापुढेही लागणार आहे.... त्यांनी गुरू, आई, बहीण, मैत्रीण ह्या चारही भूमिका बजावून आज माझ्या जीवनात स्थिरपणा आणला आणि मला उभं राहायचं सामर्थ्य दिलं आहे ...'' (पृ. ४५) वयाच्या साठीनंतरही गुरूजनांचा आधार घ्यावा लागण्याची भावना मनाला स्पर्शून जाणारी आहे.' अपंगांना संभाळून घेतलं जात नाही, पण माझ्या बाबतीत हा अनुभव अगदी उलटा ठरला आहे, मला सगळ्यांनीच सांभाळून घेतलं.'' (पृ. ५४) या त्यांच्या भावनेतील कृतज्ञता भारावून टाकणारी आहे.

पुस्तकातील 'ललित आणि अध्यात्म' या भागांमध्ये शैलाताईंनी केलेल्या प्रवासाची वाचनीय वर्णने आली आहेत. तसेच दासबोधाचा त्यांच्या जडणघडणीवर आणि व्यक्तिमत्त्वावर उमटलेला ठसा याबद्दल आणि दासनवमीवरील एक लेख आहे.

पुस्तकामधील चौथा आणि शेवटच्या व्यक्तिचित्रणात्मक भागात शैलाताईंच्या सुहृदांनी त्यांच्याविषयी लिहिलेले एकूण तेरा लेख आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू, विविध अनुभवांच्या माध्यमांतून उलगडून दाखविणारा हा भाग कॅलिडोस्कोप सारखा वाटतो. प्रत्येकाला शैलाताई कशा जाणवल्या हे व्यक्त करणारे हे लेख आहेत.

पुस्तकाचे मुखपृष्ठ शुभांगी पवार यांनी बनविले आहे. शैलाताईंच्या जीवनार्थाचा मथितार्थ सूचित करु शकेल असे सुंदर बनविले आहे. विशेषत: डाव्या कोपऱ्यात खालील बाजूस असणाऱ्या 'खडावा' रामदास स्वामींचे तत्त्वज्ञान प्रत्यक्षात जगणाऱ्या शैलाताईंच्या व्यासंग सूचित करतात.

पुस्तक वाचनीय तर आहेच, संग्राह्य देखील आहे. जीवनाच्या शाळेतील धडे देणारे आहे. इतकं चांगलं पुस्तक प्रकाशात आणल्याबद्दल अल्पनाताई बापट यांचे मनोमन आभार मानावयास हवेत. शैलाताईंची बहीण असल्याने या पुस्तकाच्या प्रकाशनाचे महत्त्व त्यांनी जाणले हे महत्त्वाचे!

शैलाताईंची ही कहाणी वाचून विधाता खरोखरच ओशाळला असेल तर नवल नाही.

**मोहन पाठक**

•••

## 'दिशा' संपर्क

विद्याप्रसारक मंडळ,
डॉ. बेडेकर विद्यामंदिर, तळमजला,
नौपाडा, ठाणे ४०० ६०२.
दूरध्वनी - ०२२२५४२६२७०

# परिसर वार्ता

## सौ. आनंदीबाई जोशी पूर्व प्राथमिक विभाग २००५-२००६

पूर्व प्राथमिक विभागातील इयत्तावार विद्यार्थी संख्या

छोटा शिशु - ११६ मोठा शिशु - १५१

एकूण विद्यार्थी - २६७

शाळेच्या वेळा पुढीलप्रमाणे

छोटा शिशु सकाळी १०.३० ते १.०० शनिवारी सुट्टी

मोठा शिशु दुपारी १.३० ते ४.३० शनिवारी सुट्टी

**शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संख्या - एकूण १६**

**शिक्षक**

प्रशिक्षित शिक्षक ६ प्रशिक्षणार्थी शिक्षक २

एकूण शिक्षक ८

**शिक्षकेतर कर्मचारी**

| | | | |
|---|---|---|---|
| लिपीक | १ | शिपाई | १ |
| साहाय्यक | ५ | स्वच्छतासेवक | १ |
| एकूण | ८ | | |

पूर्वप्राथमिक शाळेचे हे वर्ष उपक्रमांचे होते. या उपक्रमांचा अहवाल सादर करताना आनंद होत आहे.

कोणतीही पुस्तके आम्ही वापरत नसल्याने आमची अध्यापन पद्धती उपक्रमाधारित आहे. आनंददायी शिक्षणाची कल्पना पालकांना येण्यासाठी छोटा शिशु वर्गासाठी एक कार्यशाळा घेतली गेली. पालकांचा प्रतिसाद खूप चांगला होता. त्यांनी कार्यशाळेत सक्रिय सहभाग घेतला.

अध्यापन पुस्तकी न करता, अध्ययन अनुभवांच्या माध्यमांतून व्हावे, म्हणून वेगवेगळ्या ठिकाणी आम्ही क्षेत्र सहली आयोजित केल्या. त्यातून विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान मिळाले. या प्रकल्पाचा भाग म्हणून पशु इस्पितळ, बाजार, किराणा मालाचे दुकान इ. ची निवड केली होती.

आपली मूल्ये व परंपरा समजाव्यात यासाठी सर्व उत्सव उत्साहाने साजरे करण्यात आले. त्यातून विद्यार्थ्यांवर भारतीय परंपरेचे संस्कार करण्याचा आमचा उद्देश होता.

रक्षाबंधनाच्या दिवशी एकमेकांना राखी बांधण्याबरोबरच विद्यार्थ्यांना नैसर्गिक परिसराचे महत्त्व समजावे या दृष्टीने शालेय परिसरातील झाडे व झुडुपांना विद्यार्थ्यांनी राख्या बांधण्याचा उपक्रम केला. यातून सर्वांना वृक्ष रक्षणाचा संदेश पोहोचविण्यात विद्यार्थ्यांना यश आले.

'नागपंचमी' या सणाच्या दिवशी सापाच्या विविध जातींची माहिती देणारा माहितीपट दाखविण्यात आला.

स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी झेंड्याचे चित्र रंगवणे व सामूहिक देश भक्तिपर गीते म्हणून घेण्याचा उपक्रम शाळेने घेतला. बालकांना कथा सांगणे, हस्तकला शिकवणे व बडबड गीते शिकविणे सुलभ व आनंददायी व्हावे यासाठी शिक्षकांकरिता संगीत कार्यशाळा आयोजित केली होती.

'गोविंदा आला रे' च्या तालात छोट्या मुलांनी मनोरे रचून हंडी फोडण्याचा पारंपारिक उत्सव साजरा केला. 'गणेश चतुर्थीचा' सण थोडा वेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. दुकानापासून ते शाळेपर्यंत 'गणपती बाप्पा मोरया' च्या घोषात मिरवणुक काढून श्रींची मूर्ती विद्यार्थ्यांनी आणली. पूजा व पारंपारिक आरतीनंतर शिक्षकांनी मुलांना पूजा क्रियेतील विधी समजावून सांगितले, तसेच पर्यावरणाची हानी होणार नाही अशा विसर्जन सोहोळ्याबद्दलही माहिती दिली.

'दिवाळीचा उत्सव' वर्गात सजावट करून, रांगोळ्या काढून व आकाशकंदिल लावून साजरा करण्यात आला. पारंपरिक पद्धतीने दिवे ही लावले होते. लाडू, चिवडा व चकल्यांचा फराळ करून विद्यार्थ्यांनी आनंद साजरा केला.

वेशभूषा दिनानिमित्ताने वेगवेगळे पोशाख करून विद्यार्थ्यांनी विविध भूमिका केल्या होत्या.

श्रद्धा फार्म हाऊस येथे गेलेल्या सहलीत नैसर्गिक वातावरणात विद्यार्थ्यांना झाडे, पक्षी व कीटक यांच्याबद्दल बरेच काही शिकता आले. मुलांचा जडण घडणीच्या काळात आजोबा आजीचे योगदान पुष्कळ असते. विद्यार्थ्यांच्या आजोबा आजींसाठी खास 'आजोबा आजी दिन' साजरा करण्यात आला. त्यादिवशी मुलांनी सादर केलेला 'झुळुक' हा कार्यक्रम सर्वांनाच आवडला. विविध चित्रे, फुले, लावून खिसमिस चे झाड सजवून खिसमसही उत्साहाने साजरा केला गेला. संगीताच्या साथीने मुलांनी सान्ता क्लॉज चे स्वागत केले. संक्रांतीला तिळगुळाचा कार्यक्रम झाला.

मोठ्या शिशुतील विद्यार्थ्यांनी वार्षिक स्नेहसंमेलन भारतीय व पाश्चात्य संगीताच्या चालीवर रंगीबेरंगी पोशाख करून सादर केलेले नृत्य मंत्रमुग्ध करणारे ठरले. कँप फायर करून एक संपूर्ण रात्र मोठ्या शिशुतील मुले पालकांपासून वेगळी शिक्षकांबरोबर राहिली. पालकांसाठी शैक्षणिक साधने व विद्यार्थ्यांच्या कलावस्तूंचे खास प्रदर्शन वर्गात भरविण्यात आले होते.

लहान शिशुंसाठी आयोजित केलेल्या उपक्रम दिनात लहान मुलांनी पालकांसमोर विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम सादर केले. शाळेच्या तळ मजल्यावर मोठ्या शिशुतील मुलांनी विविध स्टॉल्स उभारून खाद्य पदार्थांचा बाजार भरवला. विक्री खरेदीचे एक चांगले प्रात्याक्षिक त्यातून त्यांना अनुभवता आले.

शाळेतील शिक्षकांनी पानाफुलांपासून बनविलेल्या नैसर्गिक रंगांनी होळी खेळून विद्यार्थ्यांनी होळीचा आनंदही लुटला. या सर्व उपक्रमांशिवाय विविध सोपे खाद्य पदार्थ बनविण्याचे शिक्षणही मुलांना दिले गेले.

या शैक्षणिक वर्षातील आषाढी एकादशी हा पहिला सण वैशिष्ट्यपूर्ण रीतीने साजरा केला गेला. या दिवशी रोपटी देऊन मुलांच्या हस्ते वृक्षारोपण केले गेले व झाडाच्या वाढीच्या निरीक्षणाचे शिक्षण त्यांना मिळाले. गुरूपौर्णिमेस त्यांना गुरू शिष्यांच्या गोष्टी सांगितल्या गेल्या.

शिक्षण कधीच थांबत नाही. शिक्षकांसाठी ही सततची प्रक्रिया असते. यंदा पहिल्यांदा सौ. मेघना मुळकुंद, सौ. संगीता रेळेकर व वंदना मल्होत्रा या शिक्षिकांनी १४ नोव्हेंबर २००५ रोजी परभणी येथे बालशिक्षण परिषदेला आपली 'उत्क्रांती पद्धती' या विषयावरील निबंध सादर केला. सर्वांनी या निबंधाची मुक्त कंठाने प्रशंसा केली.

आमची शिक्षणपद्धती अगदी वेगळी असल्याने या पद्धतीविषयी जाणून घेण्यासाठी मुंबई, पुणे, नाशिक येथील शिक्षकांनी शाळेला भेट दिली. तसेच शिक्षण शास्त्र पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणार्थींनीही आमच्या शाळेत अध्यापन पद्धतीचे प्रशिक्षण घेतले, शिक्षिकांचे मार्गदर्शन घेतले.

खेळातून शिक्षण या अध्यापन पद्धतीचा गेली पाच वर्षे यशस्वी प्रचलित प्रकल्प आम्ही करीत आहोत. शिक्षक म्हणून स्वत:ला परिपूर्ण करण्याचाही आमचा प्रयत्न असतो. त्यामुळेच विस्तारित क्षितिजांच्या शोधात आम्हीही अनेक शाळांना भेटी देतो, पाठिंबा व कार्यशाळांत सहभागी होतो.

**सौ. मेघना मुळगुंद,**
शिशु विकास प्रमुख

**सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम प्राथमिक विभाग - अहवाल २००५ - २००६**

शिक्षक, विद्यार्थी संख्या व शाळेच्या वेळा

**वर्गवार विद्यार्थी संख्या २००५ - २००६**

| इयत्ता | अ | ब | क | पूरक |
|---|---|---|---|---|
| १ली | ५८ | ५८ | ५६ | १७२ |
| २री | ६३ | ६२ | ६३ | १८८ |
| ३री | ६२ | ६२ | ६१ | १८५ |
| ४थी | ५६ | ५७ | ५७ | १७० |
| एकूण | २३९ | २३९ | २३७ | ७१५ |

२००६ - २००७

| इयत्ता | अ | ब | क | पूरक |
|---|---|---|---|---|
| १ली | ५० | ५१ | ४९ | १५० |
| २री | ५७ | ५५ | ५६ | १६८ |
| ३री | ६१ | ६१ | ६४ | १८६ |
| ४थी | ६१ | ६० | ५९ | १८० |
| एकूण | २२९ | २२७ | २२९ | ६८४ |

शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी

| | २००५-२००६ | २००६-२००७ |
|---|---|---|
| शिक्षक | १५ | १५ |
| संगणक शिक्षक | २ | १ |
| शिक्षकेतर | २ | २ |
| ग्रंथपाल | १ | १ |

## शाळेत साजरे झालेले महत्त्वाचे दिवस व उपक्रम

- सर्व राष्ट्रीय सण व विज्ञान, कला व हस्तकला प्रदर्शने
- कै. श्रीमती रोशन पटेल यांच्या स्मरणार्थ २३ जून २००६ रोजी चित्रकला उपक्रम राबविण्यात आला.
- सौ. नांदेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांनी पाणिनीच्या सूत्रांचे पाठांतर करण्याचा उपक्रम सुरू आहे.
- बारकऱ्यांची माहिती व्हावी यासाठी दिंडीचे आयोजन केले गेले.
- पहिलीतील मुलांनी वकील, डॉक्टर, संगणक तंत्रज्ञ इ. व्यावसायिकांची मुलाखत घेऊन या क्षेत्रांची माहिती मिळवली.
- शिष्यवृत्ती परीक्षेसाठी बसलेल्या ७८ विद्यार्थ्यांपैकी ७७ जण उत्तीर्ण झाले व निकाल ९९.६७% लागला.
- सर्व शिक्षा मोहीमे अंतर्गत महापालिकेने विज्ञान प्रकल्प स्पर्धा घेतली. सौ. उषा याबगल व निरूपमा मौर्य या शिक्षिकांच्या मार्गदर्शनाखाली कु. अमित शहा व तुषार प्रसादे यांच्या प्रकल्पास द्वितीय क्रमांक मिळाला.
- नॅशनल सोसायटी ऑफ द फ्रेंड ऑफ द दीज यांनी आयोजित केलेल्या भाजी व फळे प्रदर्शनात ४ थी क मधील अभिषेक जोशी याला पुष्प प्रदर्शनाचे २रे व ३रे पारितोषिक मिळाले.
- पुढील प्रमाणे क्षेत्रीय सहलींचे आयोजन करण्यात आले.

  १ली - एस.टी. कार्यशाळा, २री बाजार, ३री बँक या सहलीला विद्यार्थ्यांना त्या त्या क्षेत्राचे प्रत्यक्ष काम पहायला मिळाले.
- फेब्रुवारी २००६ मध्ये पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी राम भट शाळेत राहून जागरणाचा कार्यक्रम घेतला गेला.
- अनेक विद्यार्थ्यांनी आंतरशालेय स्पर्धात भाग घेऊन पारितोपिके मिळविली. ती पुढीलप्रमाणे

→ कै. जानकीबाई गोखले संस्कृत गीता पठण स्पर्धेत ४थी अ मधील नेहा पुसाळकर हिला ३ रा क्रमांक मिळाला तर ३री अ तील आदिती गोखले हिला उत्तेजनार्थ पारितोपिके मिळाले.

→ श्री वत्सला बालमंदिरम् संस्कृत यांनी आयोजित केलेल्या स्पर्धेत नेहा पुसाळकर ला संस्कृत कथा कथनात प्रथम क्रमांक मिळाला.

→ **गीता पठण स्पर्धा -**

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांक | कु प्रमिला बोनावली |
| द्वितीय क्रमांक | कु. नील शृंगारपुरे |
| | कु. ओम बापट |
| | कु. शुभंकर जोगळेकर |
| तृतीय क्रमाक | कु. अनुपा मुके |
| | कु. एकलव्य अमृते |

## क्रीडा

- ठाणे जिल्हा टेबलटेनिस चॅम्पियनशिप (२००५) या सीकेपी क्लब आयोजित स्पर्धेत राधा जोशीने उपान्त्य फेरी गाठली.
- ठाणे प्रेस कॅमेरामेन आयोजित जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत वेलफेअर असोशिएशन कु. अंबरीश विचलकर (३री अ) याला सहभाग प्रमाणपत्र मिळाले.
- सद्गुरू अवनेश्वर दादाजी जनकल्याण संस्थेच्या कार्यवल स्पर्धेत ४थी अ मधील तेजस गोखलेला तृतीय क्रमांक आला तर २री क मधील कु. ऋचा नाताळ हिला तिसरा क्रमांक मिळाला.
- १ ली अ मधील कु. स्नेहा कळवेकर हिला ठाणे जिल्हा कराटे संघटनेच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक (प्रमाणपत्र व पदक) मिळाला.
- ८ वर्षाखालील गटात अखिल भारतीय कराटे संघटनेने आयोजित केलेल्या जांभळ्या पट्ट्यातल्या स्पर्धेत २री क मधील कु. आर्या दातार हिला द्वितीय क्रमांक मिळाला.
- ४ थी क मधील अभिषेक जोशी ने कराटे स्पर्धेत (शोलेकान अॅकेडमी आयोजित) २ सुवर्ण, १ रौप्य तर २ ब्रॉंझ पदके राष्ट्रीय स्तरावर मिळविली.

मुख्याध्यापिका, प्राथमिक विभाग

•••

## फेब्रु. २००६ - टिळक विद्यापीठ संस्कृत परीक्षेचा निकाल

परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या : २१
उत्तीर्ण झालेले विद्यार्थी : २०
विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांची संख्या : ५
प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थ्यांची संख्या : १०

## संस्कृत शिष्यवृत्ती - एप्रिल २००६ परिक्षेचा निकाल

शिष्यवृत्ती मिळालेल्या मूल्यांची नावे व गुण खालिल

कु. निरज कोलगे - ९६ गुण
कु. ओजस गोहाड - ९५ गुण
कु. रूचा कारखानीस - ९५ गुण

## संस्कृत कलादर्पण आयोजित अंतरशालेय गायनस्पर्धा - निकाल

| | | |
|---|---|---|
| गट १ | इ. ५ वी / ६ वी | कु. तन्मयी टमाले उत्तेजनार्थ |
| गट २ | इ. ७ वी / ८ वी | कु. मधुरा जोशी प्रथम क्रमांक |
| | | कु. भाग्यश्री फडके द्वितीय क्रमांक |
| | | कु. रोहन कुंटे उत्तेजनार्थ |
| गट ३ | इ. ९ वी / १० वी | कु. रूचिता वसंत प्रथम क्रमांक |
| | | कु. सुरभि गोखले उत्तेजनार्थ |
| | | कु. आकाश कांबळी उत्तेजनार्थ |

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे महानगरपालिका विधी महाविद्यालय, ठाणे

मानवी हक्क : मुद्दे व आव्हाने ह्या विषयावर कार्यशाळेचे आयोजन

दिनांक ६-१-२००७ रोजी महाविद्यालयातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या मानवी हक्क : मुद्दे व आव्हाने या विषयावरच्या तयारीचा भाग म्हणून दिनांक १९-८-२००६ रोजी वरील कार्यशाळा घेण्यात आली.

ह्या कार्यशाळेस डॉ. श्रीमती पूर्णिमा अडवाणी, (माजी अध्यक्षा, राष्ट्रीय महिला आयोग) आणि डॉ. विजय चिटणीस, (माजी सदस्य, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग) हे वक्ते म्हणून लाभले होते.

सौ. अडवाणी ह्यांनी मानवी हक्काशी संबंधित अनेक मुद्यांचा उहापोह केला. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, वेश्याव्यवसाय, बालकामगार, पिण्याच्या पाण्याच्या समस्या इत्यादींचा विचार त्यांनी मांडला. त्यांच्या उद्बोधनातून त्यांचा प्रत्यक्ष अनुभव किती समृद्ध आहे ह्याची प्रचिती





येत होती. मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आपल्याला कुठल्या आव्हानांना सामोरे जायचे आहे हे त्यांनी संपूर्ण भारतभरातील उदाहरणे देऊन विशद केले. त्यांचे उद्बोधन फारच उपयुक्त होते.

डॉ. चिटणीस ह्यांनी फौजदारी न्यायाच्या प्रशासनात मानवी हक्कांचे पालन करताना कोणती आव्हाने आहेत हे विशद केले. त्यांचे उद्बोधन फारच अभ्यासपूर्ण व ज्ञानदायक होते.

ह्या कार्यशाळेस आम्हाला वि. प्र. मंडळाचे कोषाध्यक्ष मा. य. गोखले ह्यांची उपस्थिती लाभली. आमचे एक अधिव्याख्याता डॉ. श्रीयुत डॅनियल ह्यांनी वरील कार्यशाळेच्या संयोजनाचे काम केले.

## चांगले मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी दर्जात्मक शिक्षण हवे.

दि. ५ सप्टेंबर रोजी विद्याप्रसारक मंडळाच्या स्वायत्त पाठ्य क्रमांचा पदवी व पदविकादान समारंभ पारंपारिक पद्धतीने करण्यास गेल्या दोन वर्षांपासून सुरुवात झाली. पहिल्या वर्षी आय. आय. टी. चे डॉ. दीपक फाटक, गतवर्षी संस्कृतचा व हिंदीचा व्यासंग असणारे डॉ. मो. दि. पराडकर तर या म्हणजे तिसऱ्या वर्षी भारताच्या अणुउर्जा आयोगाचे अध्यक्ष पद्मभूषण डॉ. अनिल काकोडकर प्रमुख पाहुणे म्हणून या मानाच्या समारंभास उपस्थित होते.

यंदाच्या कार्यक्रमाची सुरुवात डॉ. अनिल काकोडकर, विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व माननीय श्री. श्री. वि. करंदीकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन होऊन झाली. स्वाती जोशी यांनी शारदा स्तवन सादर केल्यानंतर डॉ. विजय बेडेकर यांनी परिचय व स्वागत पर भाषण केले. डॉ. काकोडकर यांचा परिचय सूत्र संचालन करणारे श्री. नरेंद्र बेडेकर यांनी करून दिला. पदवी पदविका प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सामूहिक शपथ घेतली. डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते या स्नातकांना पदवी प्रदान करण्यात आली.

शिक्षण क्षेत्राची स्वायत्तता याबाबत बोलताना डॉ. काकोडकर यांनी स्वायत्त पाठ्यक्रम राबवीत असल्याबद्दल विद्याप्रसारक मंडळाचे अभिनंदन केले. ''जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या स्पर्धात्मक वातावरणात असेच दर्जेदार पाठ्यक्रम टिकून राहतील'' असे सांगून ते म्हणाले, ''जग जसजसे ज्ञानधिष्ठित होईल तस तशा नवीन संधी जगभर निर्माण होतील त्यावेळी अशा अभ्यासक्रमात निर्माण होणाऱ्या मनुष्यबळाचे महत्त्व जगभर वाढत राहील.''

कार्यक्रमास व्यासपीठावर विद्याप्रसारक मंडळाचे विश्वस्त व कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व ज्येष्ठ सभासद श्री. श्री. वि. करंदीकर उपस्थित होते तर सभागृहात पदवी प्राप्त विद्यार्थ्यांबरोबर घटकसंस्थांचे प्रमुख, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शन बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी केले.

## शिक्षकदिनाचा शाळेतील समारंभ

''राष्ट्रपती राधाकृष्ण हे महान तत्त्वज्ञ तर होतेच व विश्वख्यात शिक्षक होते. शिक्षण हा जीवनाचा पाया आहे, त्या दृष्टीने त्यांनी अनेक शिक्षणसंस्थात काम करून अनेक संस्था चालू केल्या. आजच्या शिक्षकांनी आत्मपरीक्षण करून, आपण त्यांच्या पासंगाला तरी पोहोचतो का हे पहायला हवे. त्यासाठी चिंतन संशोधन लेखन केले पाहिजे. विद्या प्रसारक मंडळाच्या 'दिशा' मासिकासाठी लेखन करायला हवे असे कळकळीचे आवाहन विद्या प्रसारक मंडळाने ज्येष्ठ सभासद श्री. श्री. वि. करंदीकर यांनी डॉ. बेडेकर विद्यामंदिरात झालेल्या शिक्षकदिन समारंभात अध्यक्ष म्हणून बोलताना काढले.



भूमकर सरांचे स्वागत करताना
माननीय श्री. श्री. वि. करंदीकर

कार्यक्रमांची सुरुवात इंग्रजी माध्यमातील सौ. वीणा जोशी यांनी सादर केलेला ईशस्तवन व स्वागत गीताने झाली. प्रमुख पाहुणे श्री. वि. ह. भूमकर यांचे माननीय करंदीकर यांनी स्वागत केले तर सौ. ज्योती सोमण यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. विद्याप्रसारक मंडळाच्या घटक संस्थात २० वर्षे सेवा केल्याबद्दल विज्ञान महाविद्यालयातील डॉ. एम्. व्ही. रत्नम, डॉ. सौ. महाजन, सौ. कल्पना फळ, डॉ. सौ. साहा, श्री. प्रकाश माळी, तंत्रनिकेतनातील डॉ. सौ. रंजना जांबोरकर व सौ. निशा बडेर आणि डॉ. बेडेकर विद्यामंदिराचा प्राथमिक विभागातील सौ. सुमित्रा घोरपडे, सौ. ललिता फिरके, सौ. सुमन कटके या शिक्षकांचा मंडळाने श्री. भूमकर यांच्या हस्ते गौरव केला. या सर्वांचा परिचय सौ. रश्मी धर्माधिकारी यांनी करून दिला.

कै. श्रीमती टिल्लू आदर्श शिक्षिका पुरस्काराची इंग्रजी माध्यम (मा. वि) च्या श्रीमती पूर्णिमा साठे यांचे नाव श्री. करंदीकर यांनी घोषित केले.

''विद्यार्थ्यांशी संबंध असणारा हा पवित्र व्यवसाय आहे.'' असे सांगून प्रमुख पाहुणे श्री. भूमकर म्हणाले, ''ग. दि. मा. नी शिक्षकाची शिक्षा, क्षमा व कर्तव्य बुद्धीने जो काम करतो अशी व्यापक व्याख्या केली'' असे सांगितले.

समारंभाचा समारोप सौ. दीपाली अंबिके यांनी सादर केलेल्या पसायदानाने झाला.

### कळकळीचे आवाहन

*विद्या प्रसारक मंडळाच्या दिशा मासिकात शिक्षक प्राध्यापकांनी लेखन करावे असे सांगून या आवाहनास प्रतिसाद म्हणून सात ते आठ दर्जेदार लेख येतील अशी अपेक्षा माननीय श्री. श्री. वि. करंदीकर यांनी केली. प्राध्यापक शिक्षक या आवाहनाचा आदर करतील अशी अपेक्षा.*

\- संपादक